# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२०

-------------------------------------------

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० / फाल्गुन ९, १९४१ (शके)**

**(१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**
**(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री**
**(३) अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री**
**(४) शालेय शिक्षण मंत्री**
**(५) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री**
**(६) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**
**(७) परिवहन, संसदीय कार्ये मंत्री**
**(८) पर्यटन, पर्यावरण, राजशिष्टाचार मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

-----------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ८१**

-----------------------------------

### राज्यातील शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत

**(१) * १०१० डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.मोहनराव कदम, डॉ.वजाहत मिर्झा, आर्कि.अनंत गाडगीळ, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्रीमती स्मिता वाघ, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.कपिल पाटील, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.नागोराव गाणार, डॉ.रणजित पाटील, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड : तारांकित प्रश्न क्रमांक ४६६७८ ला दिनांक २७ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व खाजगी अनुदानित, विनाअनुदानित अंशत: अनुदानित तुकड्यांवर दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी नियुक्त झालेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत दिनांक २५ जुलै, २०१९ च्या शासन निर्णयान्वये अभ्यास समिती नेमली असून त्यास ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊनही या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला नसल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेतर्फे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशवंत स्टेडियम, धंतोली नागपूर येथे आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी दिनांक २० डिसेंबर, २०१९ रोजी धरणे आंदोलन केले असून त्यात शिक्षकांना वेतन अनुदान देण्याऐवजी प्रतिविद्यार्थी अनुदान देणे या विषयाबाबत अभ्यास करण्यासाठी स्थापन केलेला अभ्यास गट त्वरीत रद्द करणे, जुनी पेन्शन पुर्ववत लागू करणे आणि इतर अशा १७ मागण्यांचे निवेदन मा.शालेय शिक्षण मंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अभ्यास समितीचा अहवाल शासनास वेळेत प्राप्त न झाल्यामुळे सेवानिवृत्तीनंतर वृद्धापकाळातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा उदरनिर्वाह आधार काढून घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सदरील अभ्यासगट स्थापन केला असल्यास त्याचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, या अहवालात काय सुधारणा करण्यात आल्या व याबाबत शासन खुलासा करणार आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन न्यायालयीन कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्यातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी आणि इतर सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजनेचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) अभ्यासगटाच्या शिफारशी प्राप्त झाल्यावर शासनाला सादर करण्यात येतील.

(५) वित्त विभागाच्या धोरणात्मक आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात माध्यमिक व उच्च माध्यमिक विनाअनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विनावेतन काम करीत असल्याबाबत

**(२) * ५१५ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माध्यमिक व उच्च माध्यमिक विनाअनुदानित २००० पेक्षाही अधिक तर चंद्रपूर जिल्हयात ५४ विनाअनुदानित शाळेतील २२ हजार ५०० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मागील १७ वर्षापासून विनावेतन काम करीत असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून तसेच शिक्षक व कर्मचाऱ्यांची होणारी उपासमार थांबविण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) शासन निर्णय, दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ व ९ मे, २०१८ नुसार माध्यमिक शाळेतील २००८६ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सरसकट २० टक्के अनुदान उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. उर्वरित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/तुकड्यांना दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ नुसार २० टक्के अनुदान मंजूर करण्यात आले आहे. प्रत्यक्ष अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

तसेच अनुदानासपात्र घोषित केलेल्या उच्च माध्यमिक शाळा/वर्ग तुकड्यांना अनुदान उपलब्ध करुन देण्यासंदर्भात आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(२) महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ मधील नियम ४(३) नुसार विनाअनुदानित शिक्षकांना वेतन देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुस्लीम समाजाच्या आरक्षणाबाबत

**(३) * ४१८ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ४७७१८ ला दिनांक २७ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याबाबतच्या अनेक वर्षापासूनच्या मागणीच्या अनुषंगाने दिनांक ९ जुलै, २०१४ रोजी तत्कालीन शासनाने मुस्लीम समाजासाठी (विशेष मागास प्रवर्ग) नोकऱ्यांमध्ये व शैक्षणिकदृष्टया ५ टक्के आरक्षण देण्याबाबतचा निर्णय घेऊन आरक्षण लागू करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाचा अध्यादेश प्रस्थापित केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील मुस्लीम समाजाला ५ टक्के आरक्षण द्यावे या मागणीसाठी मुस्लीम समाज व संघटनांनी सन २०१९ मध्ये विविध ठिकाणी मुकमोर्चे व आंदोलनाद्वारे शासनाचे लक्ष वेधले होते, परंतु शासनाने त्याची दखल घेतली नाही, तसेच उक्त प्रकरणी मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेवर मुस्लिमांना शासकीय नोकऱ्या व शैक्षणिक संस्थांमध्ये ५ टक्के आरक्षण देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने अनुकूलता दर्शवून शासनास आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात मुस्लिमांना योग्य आरक्षण आणि विशेष तरतुदी द्याव्यात अशी शिफारस शासनाने नेमलेल्या अनेक आयोग, समिती, अभ्यास गटांनी केली असून त्याची अंमलबजावणी झाली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्यासंदर्भातील तसेच मुस्लीम समाजास शिक्षणात आरक्षण देण्याबाबतच्या प्रक्रियेची सद्य:स्थिती काय आहे, तसेच मा.उच्च न्यायालयाने अनुकूलता दर्शविलेल्या आरक्षणाची अंमलबजावणी राज्यात केव्हापासून करण्यात येणार आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुस्लीम समाज आरक्षण आंदोलनात दाखल झालेले गुन्हे परत घेण्याबाबत तसेच राज्यातील मुस्लीम समाजाला शैक्षणिक व शासन सेवेत आरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक :** (१) हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०९/०७/२०१४ रोजीच्या अध्यादेशानुसार मुस्लीम (विशेष मागासप्रवर्ग) समाजासाठी नोकरीमध्ये व शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी ५ टक्के आरक्षण देण्यात आले होते. याबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४/११/२०१४ रोजी या प्रकरणी अंतरिम निर्णय दिला आहे. सदर अंतरिम आदेशाद्वारे शासकीय व अनुदानित शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशासाठी दिलेले आरक्षण अबाधित ठेवण्यात आलेले आहे. परंतु खाजगी विनाअनुदानित संस्थामधील प्रवेश व शासकीय सेवेतील भरतीसाठी दिलेल्या आरक्षणाला स्थगिती दिली आहे. सदर अध्यादेशाचे दिनांक २३/१२/२०१४ पर्यंत कायद्यात रुपांतर न झाल्याने अध्यादेश व्यपगत झाला आहे. तथापि, दिनांक ०९/०७/२०१४ ते दिनांक २३/१२/२०१४ या काळातील शासकीय तसेच अनुदानित शैक्षणिक संस्थामधील प्रवेश अबाधित ठेवण्यात आलेले आहेत. तसेच दिनांक ०९/०७/२०१४ ते दिनांक १४/११/२०१४ या दरम्यानच्या काळातील शासकीय सेवेत झालेल्या नियुक्त्या अबाधित राहणार आहेत. सध्या सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. राज्यात २०१९ मध्ये १७ ठकिाणी आंदोलने झाली. तथापि, गुन्हे दाखल झालेले नाहीत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदी घालण्याबाबत

**(४) * ६४७ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.रामनिवास सिंह, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४७३८७ ला दिनांक २७ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यभरात प्लास्टिकचा होणारा दुष्परिणाम टाळण्यासाठी शासनाने प्लास्टिक बंदी लागू केल्यानंतरही मुंबई महापालिकेची प्लास्टिक बंदी केवळ कागदावरच असल्याचे दिसून आले असून दादर, भायखळा, बोरिवली, गोवंडी व मानखुर्द येथील मंड्यांमध्ये प्लास्टिक पिशव्यांची सर्रासपणे देवाणघेवाण सुरु असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केलेल्या पाहणीत निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्लास्टिक बंदीला ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला पण पालिकेकडून ठोस कारवाई होत नसल्याने दुकानदार व फेरीवाले यांच्या हातात पुन्हा प्लास्टिकच्या पिशव्या दिसू लागल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार पथकांनी साठा केलेल्या प्लास्टिक पिशव्यांवर प्रक्रिया करुन राज्यात संपूर्ण प्लास्टिक पिशव्या बंद करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकॉल अविघटनशील वस्तुंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना २०१८ नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मुंबई परिक्षेत्रातील ५३ प्लास्टिक उत्पादकांना उत्पादन बंद करण्याचे आदेश पारीत करण्यात आले आहेत. त्याचबरोबर, बृहन्मुंबई महानगरपालिका व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यामार्फत

संयुक्तपणे बाजारपेठा, हॉटेल्स, मॉल्स इ. ठिकाणी पाहणी करून प्रतिबंधित प्लास्टिक वापरणाऱ्यावर कारवाई केली जाते. दिनांक २३/०६/२०१८ ते दिनांक ०१/०२/२०२० पर्यंत भेटी दिल्या असून ८४२१० किलो प्लास्टिक जप्त केले आहे व ४ कोटी ५४ लाख इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

(३) मा.मंत्री, पर्यावरण यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील विभागीय आयुक्त, महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्या बरोबर व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारा मुंबई येथे दिनांक ०४/०२/२०२० रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये अधिसूचनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच अधिसूचनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व महानगरपालिकांना कृती आराखडा तयार करून शासनास सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात माध्यमिक शाळेत विद्यार्थी संख्येनुसार शिक्षक उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५) * १२४४ श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये माध्यमिक शाळेतील विद्यार्थी संख्या कितीही वाढली तरी संचमान्यतेत पद कमी झाल्यास ते वाढून मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थी संख्या उपलब्ध असताना त्यांना शिकविणारे शिक्षक उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थी संख्येनुसार शिक्षक उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही. विद्यार्थी संख्या वाढल्यामुळे एखाद्या शाळेतील शिक्षकांचे पद वाढत असल्यास असे वाढीव पद काही अटींच्या अधीन राहून अतिरिक्त शिक्षकासह त्या शाळेला उपलब्ध करुन देण्याबाबत शिक्षण संचालक यांना दिनांक १३/११/२०१८ च्या शासनपत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिवभोजन थाळी योजनेबाबत

**(६) * ५२१ अॅड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.महादेव जानकर, डॉ.रणजित पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती स्मिता वाघ, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.सदाशिव खोत, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वसामान्यांसाठी महाविकास आघाडी शासनामार्फत मा.मुख्यमंत्री महोदयांनी फक्त रुपये १०/- एवढया किंमतीत जेवण देण्याची घोषणा केल्यानंतर शिवभोजन थाळी योजना सुरू करण्याचा शासन निर्णय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने दिनांक ०१ जानेवारी, २०२० रोजी जाहीर केला आहे काय, तसेच केवळ काही हजार नागरिकांनाच दुपारी १२ ते २ या वेळेत जेवण देण्यात येणार असल्याचाही उल्लेख उक्त शासन निर्णयामध्ये आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजना राज्यातील सामान्यांची भूक भागविण्यासाठी सुरू करण्यात आली असून या योजनेचे स्वरूप हे दोन चपात्या, एक वाटी भाजी, एक वाटी वरण आणि एक मुद म्हणजे १५० ग्रॅम भात एवढेच जेवण मिळणार असल्याने ही योजना राज्यातील गरजू, भुकेले यांची भूक भागविण्यात असमर्थ ठरत असल्याने सदरहू योजनेचा लाभ साडेबारा कोटींच्या महाराष्ट्रात १८ ते २० हजार लोक घेवू शकत असल्याने इतर लोकांना त्याचा फायदा होणार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शासकीय निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे, तसेच सदरहू शासन निर्णयामध्ये अन्न पदार्थ कमी व अटी जास्त असल्याचे स्पष्ट झाले असून सदर भोजन थाळीची ठरविलेली किंमत रुपये ५०/- असून यातील उर्वरित रुपये ४०/- हे शासन संबंधित कंत्राटदाराला देणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शिवथाळीची संख्या जिल्हावार मर्यादित केल्याने अनेक गोरगरीबांना या योजनेच्या लाभापासून वंचित व्हावे लागणार असल्याने सदरहू योजना व्यापक करुन सर्वसामान्य लोकांमध्ये निर्माण झालेली विश्वासघाताची भावना कमी करण्यासाठी प्रत्येक पंचायत समितीगणच्या पातळीवर शिवभोजन थाळी केव्हा सुरू करण्यात येणार आहे, तसेच शिवभोजनाची व्याप्ती वाढवून गरीब, गरजू लोकांबरोबरच वसतिगृहातील विद्यार्थ्यांना व राज्य परिवहन महामंडळातील प्रवाश्यांना देण्यात येणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) होय.

(२) दिनांक ०१ जानेवारी, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर योजना प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येत आहे. सबब वाटप करण्यात येणाऱ्या थाळ्यांची संख्या मर्यादित ठेवलेली आहे.

(३) शिवभोजन योजनेंतर्गत सुरु करण्यात येणाऱ्या भोजनालयात रुपये १०/- प्रती थाळी याप्रमाणे भोजन उपलब्ध करून देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या थाळीमध्ये २ चपात्या, १ वाटी भाजी, १ वाटी वरण व १ मुद भात उपलब्ध करून देण्यात येते. सदर थाळीची किंमत शहरी भागामध्ये प्रतिथाळी रुपये ५०/- व ग्रामीण भागामध्ये रुपये ३५/- इतकी आहे. प्रति ग्राहकांकडून प्राप्त झालेल्या रुपये १०/- एवढ्या रकमेव्यतिरिक्त उर्वरित रक्कम अर्थसहाय्य (Subsidy) म्हणून शासन देणार आहे.

सदर योजनेंतर्गत प्रायोगिक तत्वावर प्रत्येक जिल्हा मुख्यालयी व महानगरपालिका क्षेत्रात किमान एक भोजनालय सुरु करण्यात आले आहे. भोजनालय चालविण्यासाठी सद्य:स्थितीत सुरू असलेल्या खानावळ, NGO,

महिला बचतगट, भोजनालय, रेस्टॉरंट अथवा मेस यापैकी सदर योजना राबविण्यास सक्षम असलेल्या भोजनालयाची निवड त्या-त्या जिल्हास्तरावरील समिती करते.

(४) सदर योजनेचा विस्तार करण्याच्यादृष्टीने चालू असलेल्या केंद्रात थाळी संख्या वाढविणे व ज्या शहरात सदर योजना चालू करण्यात आलेली आहे त्या शहरात केंद्राची संख्या वाढविणेबाबत विभागात कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यात शालेय शिक्षण पोषण आहार योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(७) * १०७४ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शालेय पोषण आहार योजनेतील धान्यामध्ये झालेल्या काळाबाजारामुळे विद्यार्थ्यांना पुरेसा आहार उपलब्ध न झाल्याने कुपोषणाच्या प्रमाणात वाढ झाली असून, सदर काळाबाजाराची चौकशी करुन कार्यवाही करण्याची मागणी ठाणे शहरातील माजी लोकप्रतिनिधींनी शिक्षणाधिकारी, मुंबई यांना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, ठाणे जिल्ह्यात एका सहकारी संस्थेने शालेय पोषण आहार योजनेत धान्याची खोटी कागदपत्रे सादर करुन शासनाच्या संगनमताने केलेल्या गैरव्यवहारासंदर्भात श्रीनगर पोलीस ठाणे (प.) येथे दिनांक २८ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास अन्नसुरक्षा कायद्यांतर्गत गुन्हा नोंद झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर निवेदनाच्या अनुषंगाने राज्यातील शालेय पोषण आहार योजनेतील धान्याचा काळाबाजार रोखण्यासाठी कार्यवाही करुन संबंधित गुन्हा मुलांच्या आरोग्याबाबत असल्याने संबंधितांवर पास्को व अन्नसुरक्षा कायद्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) सदर प्रमाणे तक्रार शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे प्राप्त झाली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) योजनेंतर्गत प्राप्त होणारा तांदुळ सिलबंद स्वरुपात शाळांना पुरवठा करणे, वाहतूक करणाऱ्या गाडीवर वाहतुकदाराने योजनेचा बोर्ड लावणे, प्राप्त तांदळाची नोंद एमडीएम पोर्टलवर करणे, शाळास्तरावर प्राप्त होणाऱ्या तांदळाचे वजन करणे व वजनानुसारच पोहच देणे अशा तरतूदी वाहतुकदारासोबत करण्यात आलेल्या करारनामामध्ये नमूद करण्यात आलेल्या आहेत. योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी संचालनालयास्तरावर भरारी पथकांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

योजनेंतर्गत ठाणे जिल्ह्यातील धान्याच्या गैरव्यवहाराबाबत सद्य:स्थितीत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, ठाणे (शहर) यांच्यामार्फत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भंडारा, गोंदिया, गडचिरोली व नागपूर जिल्ह्यात धान खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(८) * १२३८ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा, गोंदिया, गडचिरोली व नागपूर जिल्ह्यात धान खरेदीत गैरव्यवहार झाल्याची अनेक प्रकरणे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शेतकऱ्यांनी संबंधित विभागात अनेकवेळा तक्रारी देऊनही गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे अंशत: खरे आहे.

नागपूर, गडचिरोली, भंडारा या जिल्ह्यांतील धान खरेदीबाबत दोन्ही अभिकर्ता संस्थांकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

गोंदिया जिल्ह्यात काही धान खरेदी केंद्रांबाबत मार्केटिंग फेडरेशन या अभिकर्ता संस्थेकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(२) व (३) गोंदिया जिल्ह्यातील काही धान खरेदी केंद्राच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी करण्यात येऊन मार्केटिंग़ फेडरेशन या अभिकर्ता संस्थेकडून संबंधित संस्थांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ मधील अन्यायकारक त्रुटी दुर करण्याबाबत

**(९) * ७६ श्री.विलास पोतनीस, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड : तारांकित प्रश्न क्रमांक ३८११८ ला दिनांक २३ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी शाळांच्या मनमानी शुल्कवाढीवर नियंत्रण आणण्यासाठी राज्यात ‘महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११’ ची अंमलबजावणी दिनांक १ डिसेंबर, २०१४ पासून करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अधिनियमात सुधारणा सुचविण्यासाठी मा. उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती व्ही.जी. पळशीकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने केलेल्या शिफारशींनुसार तत्कालीन शासनाने शाळेतील

एका पालकाने तक्रार केल्यास ती सोडविण्यासाठी शिक्षण निरीक्षक कार्यालयाने दखल घेण्याची आवश्यकता नसून २५ टक्के पालकांनी शुल्कवाढीला विरोध केल्यास त्याची दखल घेण्याबाबतचे राजपत्र माहे डिसेंबर, २०१९ मध्ये प्रसिध्द केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू सुधारणेमुळे महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ हा अधिनियम पूर्णतः शैक्षणिक संस्थांना नियमाचे उल्लंघन करणारा असल्याने या सुधारणेस राज्यातील पालकांनी आणि शिक्षण क्षेत्रातील तज्ञांनी विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, राज्यातील खाजगी शाळांच्या अवाजवी शुल्क वाढीवर नियंत्रण ठेवणारी विभागीय शुल्क नियंत्रण समितीची मुदत संपूनही राज्यात एकाही विभागात नव्याने या समितीची स्थापना झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून विभागीय शुल्क समित्या अस्तित्वात नसल्याने खाजगी स्वयं-अर्थसहाय्यीत आणि विनाअनुदानित शाळा अवाजवी शुल्क वाढ करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू अधिनियमातील अन्यायकारक त्रुटी दूर करण्याबाबत तसेच खाजगी शाळेच्या अवाजवी शुल्कवाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शुल्क नियंत्रण समितीची स्थापना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) होय.

(२) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ मधील सुधारणा दिनांक २६ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या राजपत्रात प्रसिध्द केल्या असून यामध्ये संबंधित इयत्तेतील अथवा शाळेतील २५ टक्के पालकांना फी वाढी विरुध्द अपील करण्याची तरतूद केली आहे.

(३) या संदर्भात शासनास निवेदन प्राप्त झाले आहे.

(४), (५) व (६) विभागीय शुल्क नियामक समिती व पुनर्रीक्षण समिती गठीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त गावांमधील शाळांना शालेय पोषण आहार योजनेंतर्गत अनुदान देण्याबाबत

**(१०) * १५३ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.निलय नाईक, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय पोषण योजनेंतर्गत दुष्काळग्रस्त गावांमधील शाळेतील विद्यार्थ्यांना नियमित पोषण आहारासोबत आठवड्यातून तीन दिवस पुरक आहार देण्याचा शासनाने निर्णय घेतला असून त्यानुसार प्रतिदिन प्रति विद्यार्थी रुपये पाच इतके अनुदान देण्याचा निर्णय त्याचवेळी शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील पंचायत समिती हिंगणा, उमरेड, कळमेश्वर व काटोल या पंचायत समित्यांमधील शालेय विद्यार्थ्यांचे अनुदान मागील ५ महिन्यापासून शासनाकडून अदा केले नसल्याचे दिनांक ११ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील ५ महिन्यांपासून तेथील शाळांना शालेय पोषण आहाराचे अनुदान अदा न करण्याची कारणे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे, त्याचप्रमाणे सदर योजनेंतर्गत राज्यातील किती शाळांना अनुदान अदा करण्यात आले नाही, याबाबत शासनाने आढावा घेतला आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शालेय विद्यार्थ्यांचे प्रलंबित असलेले अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) शाळास्तरावर देण्यात आलेल्या पुरक आहाराची माहिती केंद्र प्रमुखामार्फत तालुकास्तरावर व तालुकास्तरावरुन एकत्रित माहिती जिल्ह्यांना देण्यात येते. जिल्हास्तरावरुन संबंधित शाळांना प्रतिपूर्तीची रक्कम अदा करण्यात येते.

सदर प्रक्रियेमुळे विहित कालावधीत देयके अदा करण्यास विलंब लागला आहे. सद्य:स्थितीत पुरक आहारासाठी पात्र असलेल्या राज्यातील ४३,९९७ शाळांपैकी २३,५९७ शाळांना अनुदान वितरीत केले आहे. त्यामध्ये नागपूर जिल्ह्यातील ७०९ शाळांपैकी ३१७ शाळांचा समावेश आहे. राज्यातील अनुदानास पात्र असलेल्या उर्वरित १४,३५९ शाळांची परिपूर्ण देयके अप्राप्त असल्याने सदर शाळांचे अनुदान प्रलंबित आहे.

(४) जिल्हा परिषदस्तरावरील सन २०१८-२०१९ मधील अखर्चित निधीतून पुरक आहाराची देयके अदा करण्याबाबतच्या सूचना जिल्ह्यांना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात खाजगी ट्रॅव्हल्स कंपन्या सर्वसामान्यांकडून अवाजवी तिकिट दर आकारुन अवैध प्रवासी वाहतूक सुरु असल्याबाबत

**(११) * १०२० डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग : तारांकित प्रश्न क्रमांक ४६९६१ ला दिनांक १ जुलै, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: मुंबई येथील खाजगी ट्रॅव्हल्स कंपन्या सर्वसामान्य प्रवाशांकडुन जादा भाडे आकारत असून सांगोला (जि.सोलापूर) शहर व तालुक्यात ग्रामीण भागातून शहराकडे आणि शहरातून ग्रामीण भागाकडे अवैध प्रवासी वाहतूक सुरु असल्याचे दिनांक १० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिवहन आयुक्तालयाच्या पाहणीत मुंबई, ठाणे तसेच उर्वरित महाराष्ट्रात सर्वाधिक दोषी वाहने आढळली असून अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे अपघातांचे प्रमाण वाढत असल्याने वाहतुकीमुळे महाराष्ट्र राज्य वाहतूक महामंडळाचे उत्पन्न घटत चालले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध प्रवासी आणि गर्दीच्या हंगामात तिकिटाचे जादा भाडे आकारुन प्रवाशांची फसवणूक करणाऱ्या व याप्रकरणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कारवाई करुन खाजगी ट्रॅव्हल्सवर नियंत्रण आणण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) अशा आशयाची बातमी दिनांक १०/१२/२०१९ रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेली आहे.

उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, अकलुज कार्यालयाच्या वायुवेग पथकामार्फत माहे डिसेंबर, २०१९ मध्ये केलेल्या कारवाईत २८ वाहने दोषी आढळून आली. सदर कारवाईतून रुपये ६६९००/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.

(२) राज्यातील सर्व प्रादेशिक व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून माहे एप्रिल, २०१९ ते माहे डिसेंबर, २०१९ या कालावधीत केलेल्या वाहनांच्या तपासणीत २३,३६९ वाहने दोषी आढळून आली असून सदर कारवाईतून रुपये १८३३.८४ लाख इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.

तसेच मुंबई विभागात १३७८ व ठाणे विभागात ७५४ वाहने दोषी आढळून आली असून सदर कारवाईत अनुक्रमे रुपये ७३.३१ लक्ष व रुपये १६८.२७ लाख इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.

(३) शासनाने दिनांक २७/०४/२०१८ च्या शासन निर्णयान्वये खाजगी कंत्राटी वाहनांच्या कमाल भाडेदराबाबत निर्णय घेतला असून सदर शासन निर्णयानुसार खाजगी बस प्रचालकांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या संपूर्ण बससाठी येणाऱ्या प्रती कि.मी. दराच्या ५० टक्के पेक्षा अधिक भाडेदर आकारता येत नाही.

खाजगी बस चालकांकडून जादा भाडेदर आकारल्याबाबत एकूण ७९ तक्रारी प्राप्त झाल्या असून चौकशीअंती १० तक्रारीत जास्त भाडे आकारल्याचे निदर्शनास आल्यावरुन परिवहन आयुक्त कार्यालयाने संबंधितांविरुध्द परवाना निलंबनाचे आदेश जारी केलेले आहेत.

तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय, कोल्हापूर व उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, वसई यांच्याव्दारा केलेल्या कारवाईत प्रत्येकी १ प्रकरणी अनुक्रमे रुपये ५४००/- व रुपये ४०००/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरामध्ये भेसळयुक्त दुधाची विक्री होत असल्याबाबत

**(१२) * ३२४ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरामध्ये अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे भेसळयुक्त दुधाची मोठ्या प्रमाणात विक्री होत असल्याने नागरिकांचा जीव धोक्यात आल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भेसळयुक्त दुध विक्रीबाबत अन्न व औषध प्रशासन विभागाकडून दुधाची भेसळ रोखण्याकरीता नागपूर विभागाच्या सहायक आयुक्तांनी वर्षभरात दुधभेसळीवर कारवाई केली असता दुधाचे नमुने तपासले जात नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कृत्रिम दुध विक्रेत्यांना शासनामार्फत परवानगी प्रदान करण्यात आली आहे काय, टोन्ड दुधाच्या नावाखाली दर्जा नसलेले दुध शहरातील हॉटेलमध्ये चहा व इतर पदार्थ तयार करण्याकरीता वापरले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होऊ नये यासाठी भेसळयुक्त दुधाची विक्री थांबविण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

(३) कृत्रिम दुध विक्रेत्यांना परवानगी प्रदान करण्यात आलेली नाही.

टोन्ड दुधाच्या नावाखाली दर्जा नसलेले दुध शहरातील हॉटेलमध्ये चहा व इतर पदार्थ तयार करण्याकरीता वापरले जाते, ही बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि, खबरदारीची उपाययोजना म्हणून अन्न व औषध प्रशासनाव्दारे नागपूर शहरात दुध व दुग्धजन्य पदार्थातील भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाव्दारे नियमितपणे धाडी जप्तीची कारवाई करून, सदर कारवाई दरम्यान दोषी आढळलेल्या व्यक्तीविरूध्द अन्न सुरक्षा व मानदे कायद्यान्वये कायदेशीर कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळाबाहय मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याबाबत

**(१३) * ४८२ ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जनार्दन चांदूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एका सामाजिक संस्थेने केलेल्या पाहणीत ६ ते १४ वयोगटातील ४२ हजार ७६८ शाळाबाहय मुलांची नोंदणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, बालकांचा मोफत सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम २०११ लागू होऊन ७ वर्षे पूर्ण होऊन सुध्दा राज्यातील शाळाबाहय मुलांचे मागील तीन वर्षांपासून सर्वेक्षण न झाल्याने लाखो गोरगरीब मुले शिक्षणापासून वंचित असल्याने मा.उच्च न्यायालयाने माहे मार्च, २०१८ अखेरपर्यंत राज्यात शाळाबाहय मुलांचा सर्वेक्षणाचा कार्यक्रम राबवून माहिती सादर करण्याचे आदेश मा.शालेय शिक्षण मंत्री तसेच मा.महिला व बालविकास मंत्री यांना दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार माहे जून, २०१८ अखेरपर्यंत शाळाबाह्य मुलांचा सर्वेक्षणाचा कोणताही कार्यक्रम शासनाकडून आखला गेला नसल्याने 'समर्थन' संस्थेने दिनांक ३ जुलै, २०१८ रोजी लेखी निवेदनाद्वारे ही बाब मा.मुख्यमंत्री, मा.शालेय शिक्षण मंत्री, मा.महिला व बालकल्याण मंत्री, मा.आदिवासी विकास मंत्री तसेच शिक्षण संचालक यांच्या निदर्शनास आणून दिली, हे खरे आहे काय,
(४) तसेच सन २०१० मध्ये शिक्षण हक्क कायदा लागू झाल्यानुसार राज्य शासनाने सन २०११ मध्ये नियम लागू केले असून महाराष्ट्र राज्यात सन २०१८-२०१९ मध्ये ६ ते १४ वर्षे वयोगटातील ३३ हजार पेक्षा जास्त मुले शाळाबाह्य असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळाबाहय मुलांचे सर्वेक्षण करण्याबाबत तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्याची अंमलबजावणी करुन त्यांना शिक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) अंशत: खरे आहे.

शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ च्या सुरूवातीस ४२७६८ शाळाबाहय मुलांचा शोध घेवून त्यांना शाळेत दाखल करण्यात आले.
(२) हे खरे नाही.

दरवर्षी शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीस शाळेतील शिक्षक बालरक्षक म्हणून त्यांच्या कार्यक्षेत्रातील गावात गृहभेटी देवून मुलांचे सर्वेक्षण करून शाळाबाहय मुले व विशेषत: स्थलांतरीत होणाऱ्या कुटुंबांच्या मुलांना शोधण्याचे काम करतात व त्यांच्या पालकांचे समुपदेशन करून मुलांना शाळेत दाखल करण्यासाठी प्रवृत्त करतात. तसेच आवश्यक असल्यास स्थलांतरीत होणाऱ्या कुटुंबांच्या मुलांसाठी शालेय व्यवस्थापन समितीमार्फत हंगामी वसतिगृहाचे आयोजन करून मुलांना शाळेत दाखल करण्यात येते.

शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० च्या सुरूवातीसही अशाच प्रकारची शोधमोहिम आयोजित करण्यात आली होती, त्यात ३५३०४ शाळाबाहय मुलांचा शोध घेवुन त्यांच्या पालकांचे समुपदेशन करून मुलांना शाळेत दाखल करण्यात आले.

(३) व (४) अंशत: खरे आहे.
(५) वरील २ प्रमाणे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धोपावे तरीबंदर (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील ग्रामस्थ पाण्यापासून वंचित असल्याबाबत

**(१४) * ५९ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धोपावे ग्रामपंचायत (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) अखत्यारीत असलेली कुळेवाडी तरीबंदर जलस्वराज्य व नळ पाणीपुरवठा योजना कार्यरत असूनही तरीबंदर ग्रामस्थ मागील वर्षभर पाण्यापासून वंचित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी धोपावे ग्रामपंचायतीचे सरपंच, गुहागर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, सभापती, उपसभापती, तहसिलदार, गुहागर, उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग यांना वारंवार लेखी निवेदनाव्दारे मागील वर्षभर कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामसभेमध्ये ठरल्याप्रमाणे काम होत नाही, शासनाच्या टंचाईकृती आराखड्यात तरीबंदर वाडीसाठी मेनलाईन रिपेरिंगसाठी निधी उपलब्ध करून दिला असून तो निधी तरीबंदरसाठी खर्च न केल्यामुळे योजनेचे काम अपूर्ण आहे, सदर निधी तरीबंदरसाठी खर्च करण्यात यावा व योजनेचे काम पूर्ण करण्यात यावे, या योजनेची कामे पूर्ण झाल्याशिवाय त्या कामाची देयके ठेकेदारांना देऊ नयेत, व्यवस्थित पाणीपुरवठा करून मिळावा आदी मागण्या सदरहू निवेदनात स्पष्टपणे नमूद केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

धोपावे तरीबंदर येथील ग्रामस्थांकडून दिनांक २४/१०/२०१९ रोजीचे एकच निवेदन उपअभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, ता.गुहागर, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांना प्राप्त झालेले आहे.

(३) होय.

(४) जलस्वराज्य टप्पा-१ कार्यक्रमांतर्गत धोपावे गावासाठी राबविण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजनेतील तरीबंदरकरीता पाईपलाईन दुरुस्तीचे काम आणि पाटीलवाडी, जाधववाडी, गुढेकरवाडीकरीता पाईपलाईन दुरुस्तीचे काम पाणी टंचाई कार्यक्रम २०१८-२०१९ अंतर्गत करण्यात आले. सदर कामाची निविदा रक्कम रुपये ८.९९ लक्ष असून योजनेवरील खर्चाची रक्कम रुपये ८.७९ लक्ष इतकी आहे. सदर काम दिनांक १७/०६/२०१९ रोजी सुरु होऊन ते दिनांक २९/०६/२०१९ रोजी पूर्ण करण्यात आले असून पाणीपुरवठा नियमितपणे सुरु करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत पाणीपुरवठा सुरु असल्याबाबत सरपंच, ग्रामपंचायत, धोपावे यांनी दिनांक ०३/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये उपअभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, ता.गुहागर, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांना कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील रासायनिक कंपनीमधून सोडण्यात येणाऱ्या प्रदूषित सांडपाण्याबाबत

**(१५) * १०३५ श्री.बाळाराम पाटील, श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४६५३९ ला दिनांक २७ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुधागड तसेच तळोजा एमआयडीसी पनवेल (जि.रायगड) येथील वाढते जलप्रदूषण व रासायनिक कंपनीमधून प्रदूषित रासायनिक सांडपाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता प्रदूषित पाणी थेट अंबा नदीत सोडल्यामुळे पिण्यायोग्य पाणी पूर्णतः प्रदूषित झाले असून प्रदूषित पाण्यामुळे परिसरातील शेती, बागायती व ग्रामस्थांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्ह्यातील रासायनिक कंपन्यांना प्रदूषित सांडपाणी प्रक्रिया करून सोडण्याबाबत पर्यावरण विभागाची अट असतानाही सदर कंपन्या या प्रदूषित सांडपाण्यावर कोणतीच प्रक्रिया न करता सांडपाणी नदीत सोडल्यामुळे नदीपात्रालगत असलेले शेती बागायती व ग्रामस्थांचे नुकसान होत असतानाही शासन याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रायगड जिल्ह्यातील रासायनिक कंपनीविरूध्द कारवाई करुन जिल्ह्यातील जनतेला न्याय देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील औद्योगिक वसाहतीतील दूषित पाणी खामनदीच्या प्रवाहात सोडल्याबाबत

**(१६) * ७४९ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील वाळुंज औद्योगिक वसाहतीतील विविध कंपन्यामधील दूषित सांडपाणी खामनदीच्या पात्रात सोडल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक शेतकरी पाईपलाईनव्दारे खामनदीच्या पात्रातील पाणी शेतीला घेत असल्याने बागायती शेती धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार खामनदीच्या पात्रात सांडपाणी सोडणाऱ्या कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) हे खरे नाही. तथापि, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील काही भागातून अप्रक्रियाकृत घरगुती सांडपाणी खामनदीच्या पात्रामध्ये मिसळत असल्याचे निदर्शनास आले होते.

(२) हे खरे नाही.

(३) वाळूंज औद्योगिक वसाहतीतील सामायिक सांडपाणी प्रक्रियेतील सांडपाणी पाईपलाईनद्वारे खामनदीमध्ये सोडण्यात येते.

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील काही भागातून अप्रक्रियाकृत घरगुती सांडपाणी खामनदीच्या पात्रामध्ये मिसळत असल्याचे निदर्शनास आल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत औरंगाबाद महानगरपालिकेला दिनांक ११/०९/२०१९ व दिनांक ०३/०१/२०२० रोजी निर्देश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जलस्त्रोत प्रदूषित असल्याचे केंद्रीय मंत्रालयाच्या पाहणीत आढळून आल्याबाबत

**(१७) * ७३ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.जयंत पाटील, डॉ.सुधीर तांबे, डॉ.परिणय फुके, श्री.अनिल भोसले : दिनांक १८ डिसेंबर, २०१९ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक ४६६४५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय पेयजल आणि स्वच्छता मंत्रालयाने राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१९ मध्ये ४ लाख ८९३ जलस्त्रोतांची पाहणी केली असता त्यापैकी १ लाख ७३ हजार ४८४ इतके म्हणजेच ३७ टक्के नैसर्गिक जलस्त्रोत प्रदूषित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, नैसर्गिक जलस्त्रोत प्रदूषित होण्यास औद्योगिक क्षेत्रामधील रासायनिक व घरगुती सांडपाणी सर्वाधिक जबाबदार असल्याचे या पाहणीत निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्थानिक पातळीवर जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस प्रमुख, जिल्हा न्यायाधीश आणि प्रदूषण नियंत्रण मंडळ यांची केंद्रीय पातळीवर नदी पुनरूत्थान संयुक्त समिती स्थापन करण्यात आली होती, सदर समितीने या प्रकरणी कारवाई करुन त्याबाबतचा अहवाल पाठविण्याचे आदेश केंद्र शासनाने राज्य शासनास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जलप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात राज्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांच्या तपासणीमधील केंद्र शासनाच्या IMIS वर झालेल्या नोंदीनुसार रासायनिक तपासणीतून १०.१ टक्के व जैविक तपासणीतून ८.३९ टक्के स्त्रोत दूषित आढळून आलेले आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कोणत्याही उद्योगास नदीमध्ये अप्रक्रियायुक्त सांडपाणी विसर्ग करण्यास परवानगी देत नाही.

तथापि, महाराष्ट्रातील नद्यांचे प्रदूषण बहुतांश अप्रक्रियाकृत व अंशत: प्रक्रियाकृत घरगुती सांडपाणी नदीपात्रात सोडल्यामुळे होते.

(३) हे खरे आहे.

नदी प्रदुषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हा पातळीवर, जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस प्रमुख, जिल्हा न्यायाधीश आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचा समावेश असलेल्या पर्यावरण संनियंत्रण कृती दलाची स्थापना प्रदूषित नदी पट्टे असलेल्या जिल्ह्यांमध्ये करण्यात आलेली आहे. तसेच राज्य पातळीवर नदी पुनरूस्थापन समितीचे गठन करण्यात आले आहे. सदर समिती राज्यस्तरावर प्रदूषित नद्यांसाठी बनविण्यात आलेल्या कृती आराखड्यांच्या अंमलबजावणीवर संनियंत्रणाचे काम करते. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ जलशक्ती मंत्रालय, भारत सरकार ह्यांना या समितीमार्फत अहवाल सादर करण्यात येतो.

(४) जलप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आली आहे :-

क) कारखान्यांना नदीमध्ये प्रक्रियायुक्त सांडपाणी सोडण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

ख) स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांचे सांडपाणी व्यवस्थापन व घनकचरा व्यवस्थापनासाठी भांडवली खर्चातून २५ टक्के रक्कम राखीव ठेवून याच कारणासाठी वापरणे बंधनकारक केले आहे.

ग) स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या सांडपाणी यंत्रणा बांधून अद्ययावत करण्यासाठी नोटीसा दिलेल्या आहेत.

घ) कारखान्यांचे प्रदूषण निहाय वर्गीकरण करून जास्त प्रदूषण करणाऱ्या कारखान्यांना संगणकीय पध्दतीने निवडून भेटी दिल्या जातात.

ङ) १७ वर्गीकृत गटातील कारखान्यांना ऑनलाईन मॉनिटरींग सिस्टिम लावणे बंधनकारक केलेले आहे. त्यानुसार संबंधित कारखान्यांनी यंत्रणा बसविलेली आहे.

च) नदीच्या सर्वेक्षणाचे अहवाल मंडळाच्या संकेतस्थळावर ठेवले जातात.

छ) मंडळाने तयार केलेल्या अंमलबजावणी धोरणानुसार (Enforcement Policy) कारखान्यांवर कार्यवाही केली जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती रकमेपासून विद्यार्थी वंचित असल्याबाबत

**(१८) * ७०९ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी) घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शिष्यवृत्ती परीक्षेत एकूण ३००६३ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले असून पात्र विद्यार्थ्यांपैकी ५५२५ पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीची रक्कम न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वंचित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित अधिकाऱ्यांविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) होय.
(२) व (३) अंशत: खरे आहे.

शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थ्यांचे बँक खात्याची माहिती चुकीची असल्याने शिष्यवृत्तीची रक्कम बँकेकडून परत आली आहे. विद्यार्थ्यांना बँक खात्याची माहिती पुन:श्च भरण्याकरीता संधी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. उक्त बिनचूक माहिती प्राप्त करण्याची व काही विद्यार्थ्यांच्या बँक खात्याची माहिती भरुन शिष्यवृत्ती वितरणाची कार्यवाही शिक्षण संचालनालयामार्फत सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली, कोल्हापूर व सातारा जिल्हयात अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शाळांना आर्थिक मदत मिळण्याबाबत

**(१९) * ८६ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.किशोर दराडे, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सांगली, कोल्हापूर व सातारा जिल्हयाच्या काही भागात अतिवृष्टी झाल्याने शासकीय व खाजगी शाळांचे नुकसान झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळांचे नुकसानीचे पंचनामे शासनाकडून करण्यात आले असून सदर शाळांना शासनाकडून कोणतीही मदत प्राप्त झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त शाळांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) निधी उपलब्धतेनुसार क्षतिग्रस्त शाळांची दुरूस्ती/वर्गखोली बांधकाम जिल्हा नियोजन समिती, जिल्हा परिषद सेस फंड, सी.एस.आर.फंड व समग्र शिक्षा अभियान इ. माध्यमातून भरण्याची तजवीज ठेवली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जव्हार व मोखाडा (जि.पालघर) परिसर विकसित करण्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२०) * ७४५ श्री.रविंद्र फाटक : तारांकित प्रश्न क्रमांक ३८९८० ला दिनांक ६ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार व मोखाडा (जि.पालघर) तालुके मिनी महाबळेश्वर म्हणून ओळखले जात असून तेथे पर्यटकांसाठी पर्यटन क्षेत्र विकसित न केल्यामुळे सदर परिसर पर्यटनदृष्टया विकसित करण्यासाठी लोकप्रतिनिधींकडून सातत्याने मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जव्हार तालुक्यातील दाबोसा धबधबा, पलुचा धबधबा तसेच खडखड डॅम, हनुमान पॉईंट, सनसेट पॉईंट इत्यादी पर्यटन क्षेत्रांना मोठ्या प्रमाणात पर्यटकांकडून भेटी देण्यात येतात, परंतु सदर परिसराचा निधीअभावी विकास करण्यात न आल्याने कामे प्रलंबित आहेत, सदर विकासासाठी शासनाकडून निधी केव्हा उपलब्ध करुन देण्यात येईल,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जव्हार व मोखाडा परिसराचा विकास करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) होय.
(२) व (३) सन २०१५-२०१६ ते सन २०१९-२०२० या कालावधीमध्ये प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत जव्हार व मोखाडा तालुक्यातील ओसरविरा, सुर्यमाळ, देवबांध, दाभोसा धबधबा, वाशाळा, मोखाडा, खोडाळा, वॉलब्रिज इत्यादी पर्यटनस्थळांच्या ठिकाणी विकास कामांकरीता रुपये ६०३.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच जव्हार व मोखाडा तालुक्यातील पर्यटनस्थळांच्या विकासासाठी सन २०१५-२०१६ ते सन २०१८-२०१९ या कालावधीत जिल्हा वार्षिक योजनेच्या क वर्ग पर्यटनस्थळ विकास योजनेंतर्गत रुपये ४१३२.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. प्रादेशिक पर्यटन विकास योजनेमधून आणि जिल्हा वार्षिक योजनेमधून वितरीत करण्यात आलेल्या निधीमधून प्रामुख्याने प्रसाधनगृह, संरक्षक भिंत, रस्ते, पेव्हर ब्लॉक, परिसर सुशोभिकरण, पथदिवे, पाणीपुरवठा, वाहनतळ इत्यादी कामे करण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या इयत्ता चौथीच्या पुस्तकातून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास वगळण्यात आल्याबाबत

**(२१) * ४९ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.निलय नाईक, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय शाळांमधील विद्यार्थ्यांना स्थानिक संस्कृती जपत आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळावे म्हणून स्थानिक भाषा माध्यमातील शाळांसाठी आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ शासनाने स्थापन केले असून सन २०१८ मध्ये पुस्तकाविना चालणाऱ्या या शाळांसाठी यंदा पहिली ते चौथीची पुस्तके ऑगस्ट महिन्यात छापण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या महाराष्ट्र राज्य आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाने या शैक्षणिक वर्षात इयत्ता चौथीच्या अभ्यासक्रमासाठी छापण्यात आलेल्या पुस्तकातून छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास सांगणारा भाग वगळल्याचे दिनांक १७ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, इयत्ता चौथीसाठीच्या पुस्तकातून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास भविष्यात कधीही न बदलण्याबाबत विधीमंडळाच्या उभय सभागृहात सन १९९१ मध्ये तसा ठराव देखील संमत करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करणाऱ्या कृतीस जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कारवाई करुन छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास सांगणारा भाग चौथीच्या अभ्यासक्रमात रहावा यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे. सन १९९२-१९९३ पासून सुरू होणाऱ्या नवीन अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांचा अभ्यासक्रम ठेवण्यात येणार असल्याचे निवेदन करण्यात आले होते.

(४) नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रम सुधारण्यात येणार असून याबाबत योग्य काळजी घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी निवासी वसतिगृह बांधण्याबाबत

**(२२) * १०३६ श्री.विनायकराव मेटे : तारांकित प्रश्न क्रमांक ४२६७६ ला दिनांक १६ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यामधुन येत असलेले ऊसतोड कामगार वर्षातील सहा महिने राज्यातील विविध ठिकाणी जावून ऊसतोडीचे काम करीत असल्याने त्यांच्या मुलांना योग्यप्रकारे शिक्षण मिळत नसून त्यांच्या राहण्याची सोयही होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऊसतोड कामगारांच्या मुलांना योग्य प्रकारचे शिक्षण मिळावे याकरीता त्यांच्या मुलांकरीता ऊसतोड निवासी वसतिगृह असावे अशी मागणी मागील अनेक वर्षापासून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी निवासी वसतिगृह बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) नाही, हे खरे नाही.

हंगामी वसतिगृह योजना, बालरक्षक व इतर पर्यवेक्षीय यंत्रणेमार्फत अशा पालकांच्या पाल्यांना स्थलांतरापासून रोखले जाते व सदर मुलांना शाळेत प्रवेश दिला जातो. सदर मुलांसाठी शाळा व्यवस्थापन समितीमार्फत हंगामी वसतिगृह चालविण्यात येतात. काही अपरिहार्य परिस्थितीत काही मुले पालकांसोबत गेली तर त्यांना शिक्षण हमी कार्ड देण्यात येते. पालक कामासाठी स्थलांतरीत झालेल्या परिसरातील जवळच्या शाळेत शिक्षण हमी कार्ड दाखवून प्रवेश घेतात त्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होत नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आर.टी.ई.अंतर्गत शुल्काची प्रतिपुर्ती मिळणेबाबत

**(२३) * ४१ श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४७८५६ ला दिनांक २० जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने "राईट टू एज्युकेशन" हा कायदा सन २०१२-२०१३ मध्ये अंमलात आणला असून आर.टी.ई.अंतर्गत खाजगी शाळांमध्ये शासनाने ठरवुन दिलेल्या नियमाप्रमाणे २५ टक्के मुलांना प्रवेश दिला जातो व प्रवेश घेतलेल्या प्रतिविद्यार्थी सरासरी रुपये १७,६७०/- दरवर्षी शासनाने संस्थेला दयावे लागतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात आर.टी.ई. प्रवेशाच्या ९,१९५ शाळा व एकूण जागा १,१६,८६५ असून प्रवेशासाठी द्यावयाच्या शुल्काचे प्रतिवर्षी रुपये ७१५ कोटी राज्य शासनाने शैक्षणिक संस्थांना देणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संस्थेस शुल्क वेळेवर मिळत नसल्याने शाळांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असून कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी सुध्दा अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आर.टी.ई.अंतर्गत शाळांना द्यावयाचे विद्यार्थ्यांचे शुल्क त्वरित संस्थांना देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सर्व शिक्षा अभियान (समग्र शिक्षा) मधील कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत

**(२४) * ११११२ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने सुरु झालेल्या सर्वशिक्षा अभियान (समग्र शिक्षा) मधील कार्यरत असलेले कर्मचारी मागील १५ वर्षापासून कंत्राटी तत्वावर असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांनी १५ वर्षापासून कंत्राटी तत्वावर काम केल्याने शासन सेवेत कायम होऊ या आशेवर राहिल्याने शासनाच्या नोकरीतील वयोमर्यादेचा टप्पाही पार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कधीपर्यंत सामावून घेणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) व (२) सर्व शिक्षा अभियान (समग्र शिक्षा) या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार योजनेच्या कार्यान्वयनासाठी आवश्यक अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती ही कंत्राटी तत्वावर किंवा प्रतिनियुक्तीने करावयाची आहे. यानुसारच आवश्यकतेनुसार अधिकारी/कर्मचारी यांच्या नियुक्त्या कंत्राटी तत्वावर किंवा प्रतिनियुक्तीने वेळोवेळी करण्यात आलेल्या आहेत.

(३) मा.न्यायालयाच्या निर्णयानुसार कंत्राटी तत्वावरील नेमणूका/नियुक्त्या नियमित करणे ही बाब विधीग्राहय ठरत नाही. कंत्राटी नियुक्त्या नियमित केल्यास मा.सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी पारित केलेल्या न्याय निर्णयाचा अवमान होईल. त्यामुळे कंत्राटी तत्वावरील नियुक्त्या नियमित करणे उचित नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रदूषित नद्यांचे पट्टे पुनरुज्जीवीत करण्याबाबत

**(२५) * ९१७ श्री.रामदास कदम, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, अॅड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय हरित लवादाच्या माहे एप्रिल, २०१९ मधील आदेशानुसार राज्यातील नद्यांच्या प्रदूषित टप्प्यांची संख्या अधिक असल्याचे निष्पन्न झाले असून महाराष्ट्रामध्ये ४० नद्यांचे पट्टे प्रदूषित तर त्यातील २१ नद्यांचे प्रस्ताव तसेच राज्यातील ७७ नद्यांपैकी १७ नद्यांच्या ४९ प्रदूषित टप्प्यांच्या पुनरुज्जीवनासाठी शासनाने महाराष्ट्र स्वच्छ नदी अभियानांतर्गत रुपये ३८०० कोटींची तरतूद करण्याची मागणी असलेला प्रस्ताव माहे जून, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केंद्र शासनाच्या निती आयोगाकडे पाठविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रदूषणाबाबतचा तपशील काय आहे, उक्त प्रस्तावाचे स्वरुप काय आहे व त्याबाबत निती आयोगाकडून काही प्रतिसाद मिळाला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नीती आयोगाकडून उक्त प्रस्तावाबाबत प्रतिसाद मिळण्यासाठी पाठपुरावा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर प्रस्तावास मंजुरी केव्हा मिळणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) व (२) मा. राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली येथे दाखल झालेल्या प्रकरणी राज्यातील नदयांमध्ये ५३ प्रदुषित पट्टे असल्याचे आदेशात नमुद केले आहे. राज्यातील नदयांमधील प्रदूषण कमी करून त्याचे संवर्धन करण्याकरिता राज्य नदी संवर्धन योजनेंतर्गत विभागास स्थानिक प्राधिकरणाकडून (महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, ग्रामपंचायत इ.) रुपये ३८०० कोटीचे एकूण २१ प्रस्ताव प्राप्त

झाले होते. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने रुपये ३८०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मुख्य सचिव महोदयांच्या दि.२८/०६/२०१९ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये निती आयोगास विनंती करण्यात आली आहे.
(३) व (४) उक्त प्रस्तावास मान्यता मिळणेसंदर्भात पाठपुरावा करण्यात येत आहे.

-----------------

## वाडा (जि.पालघर) तालुक्यातील सिनर्जिया लाईफ सायन्सेस कंपनीवर कारवाई करण्याबाबत

**(२६) * २८४ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील गातेस ग्रामपंचायतीच्या हद्दीतील सिनर्जिया लाईफ सायन्सेस औषधांचे उत्पादन करणाऱ्या कंपनीमधून निघणाऱ्या दूषित सांडपाण्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतात सांडपाणी जावून शेतीचे नुकसान झाल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार सदर कंपनी व्यवस्थापनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) हे खरे आहे.
(२) प्रश्नाधीन विषयाच्या अनुषंगाने प्राप्त तक्रारीनुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत संबंधितांसमवेत दिनांक ३०/०१/२०२० रोजी केलेल्या पाहणीदरम्यान मे.सिनर्जिया लाईफ सायन्सेस प्रा.लि., जि.पालघर या उद्योगामधून सोडलेले औद्योगिक सांडपाणी परिसरातील शेतीमध्ये मिसळल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर उद्योगास दिनांक १८/०२/२०२० रोजी उत्पादन बंद करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील उच्च शिक्षण विभागात सहसंचालक पदाच्या नियुक्तीबाबत

**(२७) * ४०४ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उच्च शिक्षण विभागात सहसंचालक पदासाठी गोपनीय पध्दतीने अर्ज मागवत निवड प्रक्रिया पूर्ण केल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून सदर निवड प्रक्रियेतून निवड केलेल्या १२ जणांना सहसंचालक पदाचा कार्यभार सोपविण्यात आल्याने सदर पदाकरीता गोपनीय पध्दतीने अर्ज मागविण्यामागची कारणे काय आहेत,

(२) असल्यास, सदर पदाकरीता राज्यात राष्ट्रपती राजवट लागू असताना एका गोपनीय पत्राद्वारे सहसंचालक पदासाठी नियुक्त प्रक्रिया राबविण्यात आल्यामुळे या प्रक्रियेची चौकशी करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर निवड प्रक्रिया रद्द करण्याबाबत कार्यवाही करुन सदर निवड प्रक्रियेत दोषी असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

राज्यातील उच्च शिक्षण विभागातील सहसंचालक पदाचे सेवाप्रवेश नियम अंतिम झाले नसल्यामुळे सदर पदावरील नियुक्तीकरीता गठीत केलेल्या निवड समितीच्या शिफारशीनुसार पात्र उमेदवारांची केवळ तात्पुरत्या स्वरुपात सदर पदावर नियुक्ती करण्यात येते. तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त विभागीय सहसंचालकांना देण्यात आलेली मुदतवाढ दिनांक १५/११/२०१९ रोजी संपुष्टात येणार असल्याने निवड प्रक्रिया राबविणे आवश्यक होते. सदर नियुक्त्या ह्या शासकीय महाविद्यालये/शासकीय संस्थेतील प्राध्यापक/ सहयोगी प्राध्यापक यामधून तात्पुरत्या स्वरुपात करावयाच्या असल्याने अर्ज मागविताना संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या पत्रान्वये तात्काळ व गोपनीय या शीर्षानुसार प्राचार्य/संचालक, शासकीय महाविद्यालये/संस्था यांना पत्रव्यवहार करण्यात आला होता तसेच ही बाब तात्काळ इच्छुक उमेदवारांच्या निदर्शनास आणण्याबाबत कळविण्यात आले होते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त विभागीय सहसंचालकांना देण्यात आलेली मुदतवाढ दिनांक १५/११/२०१९ रोजी संपुष्टात येणार असल्याने निवड प्रक्रिया राबविणे आवश्यक होते. त्यामुळे विहित कार्यपध्दतीने निवड प्रक्रिया राबविण्यात येऊन सहसंचालक पदावरील तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्त्या ह्या शासन मान्यतेनंतरच करण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) येथील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या पर्यटक निवासाची इमारत विनावापर पडून असल्याबाबत

**(२८) * १०९१ श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या पर्यटक निवासाची इमारत विनावापर पडून असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील पंधरा वर्षात या इमारतीबाबत नवनवीन धोरण आखले गेले, पंचतारांकित हॉटेल प्रस्ताव, संत विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीचा प्रस्ताव, मात्र याबाबत कोणताच निर्णय घेण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरासाठी समितीच्या माध्यमातून बांधण्यात आलेल्या भक्तनिवासाचा पर्यटक वापर करीत असताना पर्यटन विभागाची इमारत ही विनावापर, महसूलविना पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर पर्यटक निवासाच्या इमारतीचा वापर होण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) हे खरे नाही.

पंढरपूर येथील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचे पर्यटक निवास सन १९९५ मध्ये श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर यांना ३० वर्षाकरीता भाडेपट्टयाने दिले आहे. सदर समितीमार्फत भाविकांना भक्त निवास उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(२) सदर जागेत श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत संयुक्तपणे 'भागवत सर्कीट' करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) सदर पर्यटन निवास व उपहारगृह या करीताचे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास दरवर्षी रुपये ८.०० लक्ष इतके भाडे निश्चित करण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अल्पसंख्यांक समाजाचे विद्यार्थी उच्च माध्यमिक आणि पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशापासून वंचित राहिल्याबाबत

**(२९) * २७८ डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उर्दु एज्युकेशन बोर्डाची मान्यता कायम ठेवत पुढील कार्यवाही करण्याचे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने देवूनही शासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे अल्पसंख्यांक समाजाच्या उच्च माध्यमिक आणि पदवीच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेशापासून विद्यार्थ्यांना वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अल्पसंख्यांक समाजाच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) रिट याचिका क्रमांक ९७४०/२०१७ मध्ये मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या अंतरिम आदेशाच्या अनुषंगाने सदर मंडळाचे विद्यार्थी, मंडळ परीक्षेस बसणेसाठीच्या अटींची पूर्तता करीत असतील तर त्यांचे मंडळ परिक्षेचे आवेदनपत्र भरून नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्याबाबत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने सर्व विभागीय मंडळांना सूचित केले आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या अंतरिम आदेशाच्या अनुषंगाने विद्यार्थी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशापासून वंचित राहिलेले नाहीत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विद्यावर्धिनी संस्था संचलित विद्यामंदिर शाळेची इमारत धोकादायक झाल्याबाबत

**(३०) * ९४० श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यावर्धिनी संस्था संचलित विद्यामंदिर शाळेची इमारत धोकादायक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांच्या जिवीताच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने व शिक्षण अखंडीत सुरू रहावे म्हणून महानगरपालिकेच्या शाळेतील रिक्त खोल्या उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) होय.

(२) विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने सदर शाळेचे स्थलांतर जवळच्या विद्यानिकेतन प्राथमिक शाळेमध्ये करण्याची तजवीज ठेवली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कस्तुरबा गांधी विद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांना मानधनाऐवजी वेतनश्रेणी देण्याबाबत

**(३१) * २२६ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४४६४२ ला दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांना मानधनाऐवजी वेतनश्रेणी देण्याबाबत शासनस्तरावरुन कोणता निर्णय घेण्यात येत आहे,

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१), (२) व (३) कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षकांना भारत सरकारकडून एकक दरानुसार एक वर्षाचे ठोक मानधन मंजूर करण्यात येते. वेतनश्रेणी देण्याबाबत केंद्र शासनाचे निकष नाहीत. सदरील विद्यालयातील शिक्षकांची कंत्राटी पध्दतीने ठोक मानधनावर नियुक्ती करण्यात येत असल्याने वेतनश्रेणी देण्याबाबतचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या ठाणे उपकेंद्राची दुरवस्था झाल्याबाबत

**(३२) * ६३९ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड : तारांकित प्रश्न क्रमांक ४४१३५ ला दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या ठाणे उपकेंद्राच्या परिसरात घाणीचे साम्राज्य, स्वच्छतागृहात दुर्गंधी, विजेचा अपुरा पुरवठा तसेच अनेक गैरसोयी असल्याचे दिनांक २४ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मुंबई विद्यापीठाच्या मुख्यालयातील प्रशासकीय कामाचा ताण कमी करण्यासाठी तसेच कोकणातील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, ठाणे आणि कल्याण येथे विद्यापीठाची उपकेंद्र सुरू करण्याचे प्रस्ताव पाठवावे असे निर्देश मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई विद्यापीठांतर्गत यापूर्वी अस्तित्वात असलेल्या विद्यापीठ उपकेंद्रांना सर्व सोयी सुविधा, कर्मचारी वर्ग, अत्याधुनिक साहित्य उपलब्ध नसून ठाणे उपकेंद्रामधील अनेक गैरसोयींबद्दल कोकणातील लोकप्रतिनिधींनी पाहणी करून विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या समस्या शासनाकडे निवेदनाद्वारे सादर केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कर्जत, कसारा, नवी मुंबई येथील विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठाचा लांबचा प्रवास करु नये यासाठी ठाणे येथे विद्यापीठाचे उपकेंद्र सुरु करण्यात आले असून येथे इंटीग्रेटेड पध्दतीने ४०० विद्यार्थी सध्या शिक्षण घेत आहेत, परंतु या विद्यार्थ्यांना ओळखपत्रे देण्यात आली नाहीत तसेच अपुऱ्या देखभालीअभावी या उपकेंद्राची दुरवस्था झाल्याने विद्यार्थ्यांना त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ठाणे उपकेंद्राच्या देखभालीसाठी तसेच विद्यापीठ उपकेंद्रांना सोयी सुविधा व कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच नवीन उपकेंद्र निर्माण करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

मुंबई विद्यापीठाचे ठाणे, कल्याण व रत्नागिरी येथे विद्यार्थ्यांच्या सोयी-सुविधेकरीता उपकेंद्राची स्थापना करण्यात आली आहे. तसेच भविष्यकालीन उपाययोजना म्हणून सिंधुदुर्ग आणि पालघर येथे जागेच्या व इतर प्रशासकीय सोयी सुविधांच्या उपलब्धतेनुसार येथे उपकेंद्र सुरु करण्याचे विद्यापीठाच्या विचाराधीन आहे.

(३) मुंबई विद्यापीठातंर्गत स्थापित झालेल्या उपकेंद्राकरीता आवश्यक सोयी सुविधा व कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

ठाणे उपकेंद्राकरीता तळमजला अधिक दोन मजले अशी सुमारे ५८,२०१ चौ.फूटाची इमारत व सदर इमारतीत नळ जोडणी व विद्युत जोडणी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विक्रोळी (पश्चिम), मुंबई येथे शालेय पोषण आहारातील धान्याचा गैरवापर होत असल्याबाबत

**(३३) * ५९५ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.नागोराव गाणार, श्रीमती स्मिता वाघ, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रोळी (पश्चिम), मुंबई येथे शालेय पोषण आहार योजनेत पुरविण्यात येणाऱ्या धान्याचा काळाबाजार केला जात असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत पुरविल्या जाणाऱ्या अन्नासाठी शासनामार्फत दिले जाणारे धान्य काळ्या बाजारात विकल्याप्रकरणी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने विक्रोळीत धान्य दुकान आणि सहकारी संस्थेवर कारवाई केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे आहे.
(२) संबंधित दुकानदारावर सदर प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत संबंधित संस्थेकडील माहे डिसेंबर, २०१९ अखेर शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पुरवठा करण्यात आलेल्या तांदळाची पडताळणी केली असता त्यांच्याकडे प्राप्त तांदूळ, शिजविलेला तांदूळ व शिल्लक तांदूळ यांचा ताळमेळ जुळून येत असल्याचे निदर्शनास आल्याने कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस रद्द केल्याबाबत

**(३४) * ११५३ श्री.प्रकाश गजभिये, डॉ.परिणय फुके, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गणेशपेठ, वर्धमान नगर, घाट रोड आणि इमामवाडा आगार (नागपूर) येथील राज्य परिवहन महामंडळाच्या ३० बसेस माहे डिसेंबर, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात रद्द करण्यात आल्या तसेच राज्य परिवहन महामंडळाच्या गणेशपेठ नागपूर आगारातील १०० बसेसच्या फेऱ्या डिझेल संपल्याने रद्द करण्यात आल्याने गणेशपेठ आगारास रुपये ३.५० लाखांचा तोटा झाल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने इंडियन ऑईल कंपनीचे डिझलचे रूपये ५० कोटी थकीत ठेवल्याने डिझेलचा पुरवठा बंद करण्यात आला, तसेच नागपूर परिवहन विभाग नियंत्रण कार्यालयामार्फत डिझेलच्या टँकरचे बुकिंग न केल्याने या सर्व बाबींचा विचार करता सदरहू बसेस रद्द झाल्यामुळे प्रवाशांची गैरसोय झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्य परिवहन महामंडळाची आर्थिक परिस्थिती सुधारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) डिझेल अभावी घाटरोड आगाराचे २३०४९ व इमामवाडा आगाराचे १४३७९ असे एकूण ३७४२८ कि.मी. नियोजनाअंती रद्द/स्थगित करण्यात आले. सदरचे कि.मी. चालवले असता येणाऱ्या खर्चात बचत झाल्यामुळे डिझेल अभावी रद्द केलेल्या कमी भारमानाच्या फेऱ्यांमुळे तोटा झालेला नाही.

(२) हे खरे नाही.

मे.इंडियन ऑईल कार्पोरेशन लि. यांचेकडून नागपूर विभागास डिझेल खरेदीसाठी रुपये १.४० कोटीचे क्रेडीट दिलेले आहे. तथापि, डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्या अखेर नागपूर विभागाची रुपये २.८९ कोटीची देयके प्रलंबित होते. तसेच मे.इंडियन ऑईल कार्पोरेशन लि. कंपनीचे डिझेलचे रुपये ५०.०० कोटी ही एकत्रित थकीत रक्कम महाराष्ट्रातील सर्व विभागांची आहे व मे.इंडियन ऑईल कार्पोरेशन लि. यांनी सर्व विभागांकरीता डिझेल खरेदीसाठी रुपये २८.०० कोटीचे महामंडळास क्रेडीट दिलेले आहे. मे.इंडियन ऑईल कार्पोरेशन लि. यांचेकडे वेळेवर डिझेल पुरवठ्याबाबत बुकींग केलेले होते व त्याचा पाठपुरावा वेळच्या वेळी करण्यात येत होता. डिझेल अभावी काही अंशी फेऱ्या रद्द कराव्या लागल्या असल्यातरी नागपूर विभागाने योग्य ते नियोजन करुन ज्या मार्गावर वारंवारीता जास्त फेऱ्या आहेत. त्यातील काही फेऱ्या नियोजन करुन रद्द केलेल्या होत्या. त्यामुळे प्रवाशांना बसेसच्या उपलब्धतेवर काही परिणाम झालेला नाही व त्यामुळे प्रवाशांची कुठल्याही प्रकारे गैरसोय झालेली नाही.

(३) महामंडळाची आर्थिक परिस्थितीत सुधारण्याकरीता उत्पन्नात वाढ व खर्चात काटकसर याबाबत सातत्याने उपाययोजना अंमलात आणण्यात येत आहेत. तसेच या अंतर्गत उत्पन्न वाढविण्याकरीता कमी उत्पन्न असलेल्या फेऱ्यांचा आढावा घेऊन त्यांचे सुसूत्रिकरण करण्यात येत आहे. ज्या मार्गावरील फेऱ्यांचे उत्पन्न चांगले आहे, तेथे नविन फेऱ्यांचे आयोजन करुन

दरवर्षी फेऱ्यांच्या उत्पन्नाबाबत आढावा घेऊन चालनीय कार्यवाही करण्यात येत आहे. अलिकडच्या कालावधीत मागणी तथा पुरवठा या तत्वावर महामंडळातर्फे वातानुकूलित शिवनेरी, अश्वमेध बसेस तसेच वातानुकूलित व विनावातानुकूलित आसन व शयनी प्रकारच्या शिवशाही बसेसच्या फेऱ्या चालनात आणून उत्पन्नात वाढ करण्याचा प्रयत्न महामंडळात सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील स्वयंपाकी व मदतनीस महिलांना मानधन देण्याबाबत

**(३५) * ६६६ श्री.आनंदराव पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, ॲड.हुस्नबानू खलिफे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक ४४१३७ ला दिनांक २० नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शालेय पोषण आहार योजनेंतर्गत स्वयंपाकी व मदतनीसांचे मानधन दरमहा तीन तारखेपर्यंत अदा करण्याच्या सूचना शिक्षण संचालक कार्यालयाने शिक्षणाधिकाऱ्यांना दिल्या होत्या मात्र राज्यात मागील सहा महिन्यांपासून या मदतनीसांना मानधन म्हणून एक रुपयाही देण्यात आलेला नसल्याचे दिनांक १३ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शालेय पोषण आहार योजनेंतर्गत ग्रामीण भागातील शाळांमध्ये पोषण आहार शिजविणे व आहार वाटप करणाऱ्या महिलांना यापूर्वी दरमहा रुपये एक हजार मानधन देण्यात येत होते, परंतु वाढती महागाई लक्षात घेता माहे एप्रिल, २०१९ पासून दरमहा रुपये दीड हजार मानधन देण्याचा निर्णय शासनाने घेतला मात्र नवीन शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून या महिलांना मानधन मिळाले नसल्याने महिलांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्वयंपाकी व मदतनीस महिलांना मानधन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) जानेवारी, २०२० पर्यंतचे स्वयंपाकी व मदतनीस मानधन अदा करण्याकरीता आवश्यक अनुदान जिल्हा परिषदांना उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. सदर अनुदान संबंधितांच्या खात्यावर वर्ग करण्याचे निर्देश शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद सर्व यांना देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिक्षकांना टी.ई.टी.च्या पूर्वतयारीस्तव सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३६) * १०९५ डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ अन्वये शिक्षक पात्रता परीक्षा (टी.ई.टी.) आवश्यक अर्हता म्हणून समजली गेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कार्यरत शिक्षकांना व शिक्षण सेवकांना शिक्षक पात्रता परीक्षा (टी.ई.टी.) आवश्यक ठरविण्यामागे कोणता उद्देश आहे तसेच आर.टी.ई. २००९ मधील कलम २३ व नियम, २०११ मधील नियम १६ व १७ नुसार शिक्षकांना, शिक्षण सेवकांना शासन ५ वर्षाची मुदत देणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कार्यरत शिक्षकांना टी.ई.टी.च्या पूर्वतयारीस्तव सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे नाही.
(२) शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) आवश्यक ठरविण्यामागे सर्व विद्यार्थ्यांना गुणात्मक व दर्जेदार शिक्षण देणे हा उद्देश आहे.

केंद्र शासनाने दिनांक ३१/०३/२०१० च्या अधिसूचनेव्दारे शिक्षक पदावर नियुक्तीसाठी पात्रता व सेवाशर्ती ठरविण्याकरीता "राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद यांना शैक्षणिक प्राधिकरण म्हणून घोषित केल्यानंतर त्यांना दिनांक २३/०८/२०१० व दिनांक २९/०७/२०११ च्या अधिसूचनेव्दारे प्राथमिक शिक्षकांना किमान शैक्षणिक पात्रता व शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य केली आहे. केंद्र शासनाच्या बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मधील कलम २३(२) मध्ये दिनांक ०९/०८/२०१७ रोजी केलेल्या सुधारणेनुसार किमान शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता दिनांक ३१/०३/२०१९ पूर्वी धारण करणे अनिवार्य आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्‌यापीठांमधील वेतनात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३७) * ६७२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सहा विद्‌यापीठांमधील प्राध्यापक व इतर अधिकाऱ्यांचे पदनाम करून सुमारे ६०० कोटी रूपयांचा गैरव्यवहार केल्यावरून बक्षी समितीने मंत्रालयस्तरावरील संबंधित दोषी अधिकारी व इतरांवर कार्यवाही करण्याबाबतचा अहवाल सन २०१८ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिप्रदान झालेल्या सुमारे ६०० कोटी रूपयांची रक्कम वसुल करण्याबाबतची शिफारसही सदर अहवालात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी मंत्रालयीन अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच दोषींकडून सदरील रक्कम वसूल करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

प्रश्न भागमध्ये नमूद रुपये ६०० कोटीबाबत अहवालात नोंद नाही.

(३) वाढीव वेतनश्रेणीबाबत निर्गमित केलेले शासन निर्णय शासनाने दिनांक १७/१२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये रद्द करून सदर पदांच्या वेतनश्रेण्या पूर्ववत करणे, अतिप्रदान झालेल्या रकमेची परिगणना करणे, निवृत्तीवेतन पुन:निर्धारित करणे इ. कार्यवाही करण्यासाठी संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या अधिनस्त “विशेष पथक” गठित केले आहे.

सदर शासन निर्णयास आव्हान देणाऱ्या अनेक याचिका मा.उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठात दाखल झालेल्या आहेत. मा.न्यायालयास विनंती करून सदरहू सर्व याचिका मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे सुनावणीसाठी एकत्रित करण्यात आलेल्या आहेत. दरम्यान मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे या विषयाबाबत दाखल असलेली याचिका क्र. १२१८/ २०१९ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक २९/०१/२०१९ च्या आदेशान्वये संबंधित कर्मचाऱ्यांना अतिप्रदान झालेल्या रकमेची वसुली करण्यास स्थगिती दिलेली असून सद्य:स्थितीत प्रकरण मा.उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

तसेच या अनियमिततेस जबाबदार असलेल्या संबंधित अधिकाऱ्यास निलंबित केलेले असून त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विद्यार्थी संख्येवरुन शिक्षकांना वेतन अनुदान देण्याबाबत

**(३८) * २६६ श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विद्यार्थी संख्येवरून शिक्षकांना वेतन अनुदान देण्याचे शासनाच्या विचाराधीन असल्याचे दिनांक ९ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शिक्षण आयुक्तालयाकडून अभ्यास गटाची स्थापना करण्याचा आदेश दिनांक ४ डिसेंबर, २०१९ रोजी निर्गमित करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील विविध शिक्षक संघटनानी केलेल्या मागणीचा विचार करुन सदर शासन निर्णय रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) व (२) आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांच्या दिनांक ०४/१२/२०१९ च्या पत्रान्वये "प्रति विद्यार्थी अनुदान" देण्याचा अभ्यास करण्यासाठी अभ्यासगट स्थापन केला होता. तथापि, सदर अभ्यासगट आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक १९/१२/२०१९ च्या पत्रान्वये रद्द करण्यात आला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पर्यटन स्थळांचा विकास करण्याबाबत

**(३९) * १६२० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विविध जिल्ह्यातील ३२० पर्यटन स्थळांचा विकास करण्याचा निर्णय पर्यटन विकास महामंडळातर्फे घेण्यात आला असून विकासासाठी अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०१९ मध्ये सुमारे रुपये १२० कोटी मंजूर केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयानुसार राज्यातील ३२० पर्यटन स्थळांचा शोध घेऊन त्यांच्या विकासाची योजना राबविण्यात आली आहे काय, तसेच सदर योजनेमध्ये राज्यातील दुरवस्था झालेल्या किल्ल्यांचा समावेश करुन राज्यातील किती पर्यटन स्थळांचा विकास करण्यात आला आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पर्यटन स्थळांचा विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१), (२) व (३) राज्यातील पर्यटनस्थळांच्या विकासासाठी सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षामध्ये "विविध ठिकाणी पर्यटन विकासासाठी मुलभूत सुविधांकरीता अनुदान (३४५२ १९५८)" या लेखाशिर्षाखाली एकूण रुपये २९५.३५ कोटी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर झालेली आहे. सन २०१९-२०२० च्या एकूण अर्थसंकल्पीय तरतूदीपैकी माहे डिसेंबर, २०१९ अखेरपर्यंत ६०% म्हणजेच रुपये १७७.२१ कोटी तरतूद खर्चासाठी एवढा निधी उपलब्ध झाला होता. डिसेंबर, २०१९ अखेरपर्यंत खर्चासाठी उपलब्ध झालेल्या रुपये १७७.२१ कोटी निधीमधून माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये मा.मंत्री (पर्यटन) यांच्या अध्यक्षतेखालील राज्य पर्यटन विकास समितीने मान्यता दिलेल्या प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत नवीन व जुन्या (स्पिलओव्हर) कामांसाठी रुपये १७६.६२ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे. यामध्ये साधारणपणे १८७ नवीन कामांचा तर १६४ जुन्या कामांचा समावेश आहे. यामधील काही कामे राज्यातील किल्ले परिसर विकासाशी संबंधित आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालम (जि.परभणी) शहराला बस स्थानक नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत असल्याबाबत

**(४०) * १६५० श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालम (जि.परभणी) शहरास तालुक्याचा दर्जा मिळून २७ वर्षे होवूनही उक्त ठिकाणी महामार्गावरील शहराला बस स्थानक नसल्याने प्रवाशांची अत्यंत गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी बसस्थानक नसल्याने आबालवृध्द महिला प्रवाशांना एसटीची वाट पाहत रस्त्याच्या कडेला उन्हात, पावसाळयात उभे रहावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पालम येथे बसस्थानक होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच उक्त महामार्गावरील शहराला बसस्थानक नसल्याची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) व (२) हे खरे नाही.

राज्य परिवहन महामंडळाद्वारे पालम येथे प्रवाश्यांची गरज लक्षात घेवून ३५ वर्षांपूर्वी रस्ता हद्दीत ४० x १० फुट आकाराचा मार्ग निवारा बांधला आहे. सदर ठिकाणी राज्य परिवहन महामंडळाची मालकीची जागा नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुरुड जंजिरा किल्ल्यावर पर्यटकांची फसवणूक होत असल्याबाबत

**(४१) * १८६० श्री.सदाशिव खोत, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरुड-जंजिरा किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्या हजारो पर्यटकांचा गैरफायदा स्थानिक बोट व्यावसायिक, लॉज व्यावसायिक व गाईड घेत असल्याने किल्ल्यावर पर्यटकांची फसवणूक होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुरातत्व विभागाकडून प्रत्येक व्यक्तीला रुपये २५ आणि गाईडला रुपये १५० ते २०० आकारले जातात तसेच शैक्षणिक सहली आणि अलिबाग येथील मुरुड-जंजिरा किल्ल्याच्या सफारीचा आनंद घेण्यासाठी आलेल्या प्रत्येक पर्यटकांकडून रुपये ८० आकारले जात असून एका समुहामध्ये दहा जण असतील तर रुपये दोन हजार आकारले जात असून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे शैक्षणिक सहल, एकदिवसीय पर्यटक सहल तसेच पर्यटकांकडून पार्किंग, फेरीबोट, किल्ल्यावरील माहिती देण्याच्या नावाखाली दुप्पट पैसे आकारले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी प्रशासनाचे कोणतेही नियंत्रण नसल्याने पर्यटकांना अधिकचा भुर्दंड सोसावा लागत असून पर्यटकांची होत असलेली आर्थिक फसवणूक रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१), (२) व (३) मुरुड-जंजिरा किल्ला हा केंद्र संरक्षित स्मारक असून भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या अखत्यारित आहे.

मौजे राजपूरी, ता.मुरुड येथील प्रवासी जेट्टीवरुन राजपूरी ते जंजिरा किल्ला या जलमार्गावर प्रवासी वाहतूक करण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून ३ संस्थांना परवानगी देण्यात आलेली आहे. सदर प्रवासी वाहतूकीसाठी प्रौढ प्रवाशांकरीता रुपये ७०/- तिकिट दर व रुपये १०/- प्रवासी कर असे एकूण रुपये ८०/- या तिकिट दरास महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच मौजे राजपूरी, ता.मुरुड येथील महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाची प्रवासी टर्मिनल इमारत, परिसर व पार्किंग हे परिचालन व देखभालीकरीता खाजगी कंपनीस भाडेतत्वावर हस्तांतरित करण्यात आला आहे. त्यामुळे पार्कींग शुल्क हे संबंधित कंपनीकडून आकारले जात आहे.

मुरुड-जंजिरा परिसरातील निवास व्यवस्था (लॉज) व गाईड या सेवा खाजगीरित्या उपलब्ध आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथील कंत्राटी कामगारांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत

**(४२) * २१३८ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथील कंत्राटी कामगारांचे वेतन गत तीन महिन्यांपासून प्रलंबित असल्याने सदर कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार कर्मचाऱ्यांना वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) व (२) हे खरे नाही.

राज्य परिवहन महामंडळात स्वच्छतेच्या कामासाठी मे.ब्रिक्स इंडिया लि. या खाजगी कंपनीला कंत्राट दिलेले असून, महाराष्ट्रातील सर्व बसेस व बसस्थानक परिसर स्वच्छतेच्या कामासाठी सदर कंपनीमार्फत कंत्राटी कामगार नियुक्त केलेले असून, सदर कामगारांचे वेतन कंपनीकडून अदा केले जाते. स्वच्छतेच्या कामाची बिले राज्य परिवहन महामंडळाकडून कंपनीला अदा करण्यात येतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील माध्यमिक शाळेतील अर्धवेळ ग्रंथपालांचे पद पूर्णवेळ ग्रंथपालमध्ये वर्ग करण्याबाबत

**(४३) * ९८६ डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.मोहनराव कदम, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील माध्यमिक शाळेतील अर्धवेळ ग्रंथपाल पद हे पूर्णवेळ ग्रंथपाल या वर्गामध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय शासनाने दिनांक २८ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास घेतला असून या निर्णयात अनेक जाचक अटींचा अंतर्भाव करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रंथपालांच्या जाचक अटी शिथील करुन १००० विद्यार्थी संस्थेऐवजी ७०० विद्यार्थी संस्थेमागे एक पूर्णवेळ ग्रंथपाल व २ शाळा मिळून एक पूर्ण वेळ ग्रंथपाल असावे अशी मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील अनेक जिल्ह्यात ग्रंथपाल समावेशनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांचेस्तरावर समायोजनाची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाकडून होत असलेले कर्जवाटप

**(४४) * ४७० प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.विनायकराव मेटे, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **कौशल्य विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषतः नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, अकोला, अमरावती येथील मराठा समाजातील सुशिक्षीत बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध व्हावा ह्या दृष्टीकोनातून अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळांतर्गत विविध कर्ज योजना लागु करूनही बेरोजगार युवकांना बँका कर्ज मंजूर करीत नसल्याने बेरोजगार लाभार्थी सदर योजनेपासून वंचित राहिल्याचे दिनांक १५ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महामंडळानी कर्जाच्या फाईली मंजूर करुनही बँका कर्ज देत नसून फक्त तारण देणाऱ्यांना कर्ज देतात तसेच यातील बहुतांश कर्ज वाटप हे जुन्या खातेदारांनाच देण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्यांना जास्त कर्जाची गरज नाही अशा गरजूंना थेट कर्ज योजनेमधून किमान ५०,०००/- रुपये कर्ज योजना चालू करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाकडून कर्ज मंजूर करुनही बँकाकडून कर्ज वाटप करण्यास विलंब होत असून अशा राष्ट्रीयकृत बँकाकडून कर्ज वाटपाबाबत होणाऱ्या विलंबाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार कर्ज वाटप विनाविलंब करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात विविध खरेदीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४५) * ४४३ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **कौशल्य विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात विविध खरेदीमध्ये सुमारे १०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झालेला असून या गैरव्यवहाराचा सविस्तर अहवाल सन २०१५ च्या सुरुवातीला तत्कालीन व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालक श्री.जे.डी.भुतांगे यांनी शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अहवालाकडे दुर्लक्ष करुन अहवालाच्या अनुषंगाने कारवाई न करता दोन वर्षे विलंबाने या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी शासनाने दिनांक २९ नोव्हेंबर, २०१७ रोजी उद्‌योग व ऊर्जा विभागाचे तत्कालीन अतिरिक्त मुख्य सचिव पोरवाल यांच्या अध्यक्षतेखाली समिती

नेमली होती व समितीने दोन महिन्यांच्या आत अहवाल सादर करावा असे आदेश दिले असूनही समितीने अहवाल सादर न केल्याने समितीला दिनांक १७ फेब्रुवारी, २०१८ व दिनांक २१ मे, २०१८ रोजीच्या आदेशान्वये मुदतवाढ देवूनही चौकशी अहवाल सादर करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे तत्कालीन संचालक श्री.जे.डी.भुतांगे यांनी सन २०१५ च्या सुरुवातीलाच सादर केलेल्या अहवालाचे स्वरुप काय आहे व त्यानुसार कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच, उक्त गैरव्यवहाराबाबत दिनांक २९ नोव्हेंबर, २०१७ रोजी शासनाने नेमलेल्या व दोन वेळा मुदतवाढ दिलेल्या समितीने चौकशी अहवाल सादर करण्यास विलंब लावून अहवाल सादर न करण्याची कारणे काय आहेत तसेच शंभर कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासंदर्भातील सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.नवाब मलिक :** (१) श्री.जे.डी.भुतांगे, तत्कालीन संचालक (व्यवसाय शिक्षण) यांनी त्यांच्या दिनांक १८/१०/२०१४ व दिनांक १०/१२/२०१५ रोजीच्या पत्रान्वये व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात खरेदीमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत तक्रार केली आहे.

(२) शासनाच्या दिनांक २९/११/२०१७ च्या आदेशान्वये गठीत केलेल्या समितीला मुदतवाढ देवून देखील चौकशी समितीने अहवाल सादर केला नाही, हे खरे आहे.

(३) तत्कालीन संचालक (व्यवसाय शिक्षण) श्री.जे.डी.भुतांगे यांनी दिनांक १८/१०/२०१४ व दिनांक १०/१२/२०१५ अन्वये संचालनालयातील खरेदीमध्ये झालेल्या अनियमिततेसंदर्भात सादर केलेला अहवाल तक्रार स्वरुपाचा आहे.

सदर तक्रारीत नमूद केलेल्या अनियमिततेबाबत सखोल चौकशी करण्यासाठी अपर मुख्य सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९/११/२०१७ रोजीच्या आदेशान्वये चौकशी समिती गठीत करण्यात आली. तथापि, समितीने विहित मुदतीत अहवाल सादर न केल्यामुळे सदर समिती रद्द करण्यात आली व या प्रकरणी तातडीने चौकशी पूर्ण करण्याकरीता तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेने अपर मुख्य सचिव (सेवा),

सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ५/८/२०१९ रोजीच्या आदेशान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. समितीद्वारे चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(४) अपर मुख्य सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९/११/२०१७ रोजीच्या आदेशान्वये गठीत करण्यात आलेल्या समितीला वेळोवेळी मुदतवाढ देवून देखील समितीने अहवाल सादर केला नाही. यास्तव, याबाबत समितीकडे खुलासा मागविला असता, सदस्य सचिव, चौकशी समिती यांनी जो काही वेळ लागलेला आहे, तो प्रशासकीय कारणास्तव व सदस्यांच्या उपलब्ध कालावधीच्या अनुषंगाने झाला असल्याचे नमूद केले आहे.

अपर मुख्य सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९/११/२०१७ रोजीच्या आदेशान्वये गठीत करण्यात आलेली समिती रद्द करण्यात येवून, त्या जागी तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेने अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ५/०८/२०१९ रोजीच्या आदेशान्वये समिती नेमण्यात आली आहे. सदर समितीची चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्याबाबत

**(४६) * ६४८ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इयत्ता ५ वी आणि ८ वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंतांना विशेषत: विदर्भातील ११ जिल्ह्यातील शिष्यवृत्तीधारकांना प्रतिमाह मिळणारी शिष्यवृत्तीची रक्कम अत्यल्प दिली जात असल्याचे दिनांक १३ जुलै, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इयत्ता ५ वी व ८ वीच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्याचा प्रस्ताव मागील तीन वर्षापासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले असून गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा संपूर्ण लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांच्या पुस्तक खरेदीच्या किंमती वाढल्या असल्याकारणाने शिष्यवृत्तीत वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) नाही.
(२) व (३) अंशत: खरे आहे. राज्यातील पहिल्या शंभर विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीचा दर जास्त असावा, पूर्ण राज्यासाठी एकत्रित गुणवत्ता यादी असावी, तसेच शिष्यवृत्तीची रक्कम ग्रामीण व शहरी न ठरविता एकाच दराने देण्याची बाब विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नगर परिषद व जिल्हा परिषद शाळांमधील मुख्याध्यापकांना सेवा संरक्षण देण्याबाबत

**(४७) * १२५९ श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये खाजगी माध्यमिक शाळेतील १०० पेक्षा कमी पटसंख्या असणाऱ्या शाळांमध्ये मुख्याध्यापकांना सेवा संरक्षण देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सेवा संरक्षण नगर परिषद व जिल्हा परिषद शाळांमधील मुख्याध्यापकांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) होय, हे खरे आहे.
(२) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये मुख्याध्यापकांची पदे अतिरिक्त असल्यामुळे उपरोक्त अट स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना लागू करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोकणातील चॅम्पियन सेक्टरला निधी मंजूर करण्यात आल्याबाबत

**(४८) * ५३३ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी पर्यटन उद्योगाला चालना देण्यासाठी कोकणात जाहीर करण्यात आलेल्या चॅम्पियन सेक्टरला रुपये ५ हजार कोटींचा निधी मंजूर होऊनही या योजनेंतर्गत एकही प्रस्ताव सादर झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वाधिक कृषी पर्यटन केंद्र कोकणात असताना कृषी पर्यटनाला अधिकृत दर्जा देण्यात आला नसून कृषी पर्यटनाबाबत नेमका आराखडा नसल्याने कृषी पर्यटन प्रस्तावाला परवानगी कोणी द्यावी याबाबतचा प्रश्न शासनस्तरावर निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पर्यटन व्यावसायिक हे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाला नोंदणीकृत नसल्याने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून कृषी पर्यटन उद्योगासाठी तयार असलेली कृषी पर्यटन केंद्रे मंजूरी अभावी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जागतिक स्तरावरील पर्यटक कोकणात आकर्षित व्हावेत, पर्यटन समृध्द बनवावे, तरुणांनी नोकरीसाठी अन्यत्र जाण्यापेक्षा पर्यटन विषयक मार्गदर्शन त्यांना मिळावे या उद्देशाने सुरू करण्यात आलेली चॅम्पियन सेक्टर योजना यशस्वी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) हे खरे नाही.

केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूरी दिलेल्या केंद्रीय वाणिज्य व औद्योगिक मंत्रालयाच्या "चॅम्पियन सर्व्हिसेस सेक्टर स्किम (CSSS)" मध्ये एकूण १२ सेवांचा समावेश असून त्यामध्ये पर्यटन व आदरातिथ्य ही एक सेवा समाविष्ट आहे. यानुषंगाने पर्यटन विभागाकडून रुपये १५८१.७५ कोटीचे

प्रस्ताव केंद्रीय वाणिज्य व औद्योगिक मंत्रालयास पाठविण्यात आले होते. तथापि, सदर प्रस्ताव चॅम्पियन सर्व्हिसेस सेक्टर स्किम (CSSS) या योजनेच्या प्रस्तावित मार्गदर्शक तत्वामध्ये बसत नसल्याचे केंद्रीय पर्यटन मंत्रालयाने कळविले आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

प्रस्तावित कृषी पर्यटन धोरण शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूरी दिलेल्या केंद्रीय वाणिज्य व औद्योगिक मंत्रालयाच्या “चॅम्पियन सर्व्हिसेस सेक्टर स्किम (CSSS)” मध्ये एकूण १२ सेवांचा समावेश असून त्यामध्ये पर्यटन व आदरातिथ्य ही एक सेवा समाविष्ट आहे. यानुषंगाने पर्यटन विभागाकडून रुपये १५८१.७५ कोटीचे प्रस्ताव केंद्रीय वाणिज्य व औद्योगिक मंत्रालयास पाठविण्यात आले होते. तथापि, सदर प्रस्ताव चॅम्पियन सर्व्हिसेस सेक्टर स्किम (CSSS) या योजनेच्या प्रस्तावित मार्गदर्शक तत्वामध्ये बसत नसल्याचे केंद्रीय पर्यटन मंत्रालयाने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील एसटीच्या आगार, बस स्थानकांवर दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांना सोयी सुविधा उपलब्ध करण्याबाबत

**(४९) * २१६३ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एसटीच्या आगार, बस स्थानकांवर दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांना व्हीलचेअर व आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात नसल्याने एसटीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन यासंदर्भात सकारात्मक निर्णय घेऊन राज्यातील एसटीच्या आगार, बस स्थानकांवर दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांना आवश्यकत्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) अंशत: खरे आहे.

दिव्यांगजनांना बसस्थानकात, कार्यालयात व प्रसाधनगृहात सहज प्रवेश/वावर करता यावा, यास्तव प्रामुख्याने जिल्हा मुख्यालय बसस्थानकाच्या प्रवेशद्वारात उताराची व त्याच्याकडेने रेलिंगची तसेच प्रसाधनगृहात कमोडची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच, ८९ आगारांतील ११० बसस्थानकांवर अपंगांसाठी वापरण्यात येणाऱ्या चाके असलेल्या खुर्च्या (व्हील चेअर्स) उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.
(२) मुंबई सेंट्रल, नागपूर-मोरभवन, नविन मध्यवर्ती बसस्थानक नाशिक, महामार्ग बसस्थानक नाशिक, पुणे, नागपूर इ. बसस्थानकात प्रमाणित फरशी, बसस्थानकाच्या व प्रसाधनगृहाच्या प्रवेशद्वारात उताराची व त्याच्याकडेने रेलिंगची व्यवस्था, प्रसाधनगृहात कमोड इ. सुविधा करण्यात आल्या आहेत. तसेच मुंबई सेंट्रल बसस्थानकात दिव्यांगाकरीता दिशादर्शक फलक लावण्यात आलेले आहेत. जिल्हा मुख्यालय व तालुका मुख्यालय तसेच प्रमुख बसस्थानकाच्या ठिकाणी तसेच इतर सर्व बसस्थानकाच्या ठिकाणी दिव्यांगाकरीता उपरोक्त सुविधा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही विभागीयस्तरावर सुरू आहे. तसेच राज्यभरात सुरू असलेल्या बसस्थानकाच्या पुनर्बांधणीच्या/दर्जावाढीच्या कामात तसेच प्रस्तावित बसस्थानकांच्या कामामध्ये दिव्यांगाकरीता उपरोक्त सुविधा देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यातील धान खरेदी केंद्रात सोयी सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(५०) * ८२७ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील खरेदी केंद्रावर सुविधांचा अभाव असल्याने शेकडो क्विंटल धान अवकाळी पावसामुळे खरेदी केंद्रावर भिजल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खरेदी केंद्रावर योग्यत्या सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे अंशत: खरे आहे.

भंडारा जिल्ह्यातील धान खरेदी केंद्रांवर खरेदी झालेला धान सुरक्षित साठवणूक केला आहे. तथापि, खरेदी केंद्रावर खरेदी न झालेला धान अवकाळी पावसामुळे भिजल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) शासन परिपत्रक क्रमांक खरेदी १०१९/प्र.क्र.९८/नापु२९, दिनांक ०९ सप्टेंबर, २०१९ मध्ये नमूद केल्यानुसार खरेदी केंद्रांवर योग्य त्या सुविधा पुरवण्याची कार्यवाही अभिकर्ता संस्थांकडून करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व शाळांत मराठी भाषा विषय अनिवार्य करण्याबाबत

**(५१) * १२ श्री.विलास पोतनीस, श्री.आनंदराव पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, डॉ.सुधीर तांबे, ॲड.हुस्नबानू खलिफे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अनिल भोसले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड : तारांकित प्रश्न क्रमांक ४६७१३ ला दिनांक २० जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व मंडळाच्या शाळांमध्ये किमान इयत्ता १० वी आणि कमाल १२ वी पर्यंत मराठी भाषा विषयाचे शिक्षण सक्तीचे करण्यासंदर्भात कायदा करण्यासाठी तज्ञ समिती स्थापन करण्यात येईल असे विधानपरिषद सभागृहात जाहीर केल्याचे दिनांक ३ जुलै, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मराठी भाषा विषय इयत्ता १० वी पर्यंत राज्यातील सी.बी.एस.ई., आय.सी.एस.ई. सह सर्व शाळांत अनिवार्य करण्याबाबत राज्यातील लोकप्रतिनिधींकडून सातत्याने होत असलेली आग्रही मागणी लक्षात घेवून शासनाने उचित निर्णय घ्यावा, असे निर्देश दिनांक १८ डिसेंबर, २०१९ रोजी मा.सभापती महोदयांनी शासनास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील सर्व मंडळाच्या शाळांमध्ये मराठी विषय अनिवार्य करण्यासंदर्भात देशाच्या इतर राज्यातील संबंधित कायदे आणि सर्वोच्च न्यायालयाच्या संबंधित निर्णयाचा अभ्यास राज्याच्या विधी विभागामार्फत करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू सुरु असलेल्या अभ्यास पूर्ण झाला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे व यासंदर्भातील अहवाल शासनाला सादर केला आहे काय, अहवालावर कोणता निर्णय घेण्यात आला,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निर्देशानुसार मराठी भाषा विषय सर्व शाळांमध्ये अनिवार्य करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) दाक्षिणात्य राज्यातील कायद्यांचा व त्याची अंमलबजावणी इ. सर्व संबंधित बाबींचा अभ्यास करून राज्यातील सर्व माध्यमांच्या, सर्व मंडळांच्या शाळांमध्ये मराठी भाषा अनिवार्य करण्याचा कायदा लागू करण्याकरीता विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने कायद्याचा मसुदा तयार करण्याचे काम सुरू आहे.

-----------------

## मुंबईत बांधकामाकरीता वापरण्यात येणाऱ्या आरएमसी प्लान्टमुळे नाले प्रदुषणात वाढ होत असल्याबाबत

**(५२) * १०५४ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत सुरु असलेल्या बांधकामाकरीता आरएमसी प्लान्ट वापरले जात असल्याने नाले प्रदुषणात वाढ होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्लान्टमधील सिमेंटच्या पाण्यावर प्रक्रिया न करता पाणी थेट नाल्यात सोडले जात असल्याने नाले प्रदूषित होत असून नाले सफाईवर महानगरपालिका कोटयवधी रुपये खर्च करत असतानाही अशाप्रकारे प्रक्रिया न करता पाणी थेट नाल्यात सोडत असल्याने बांधकाम व्यावसायिकांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१), (२) व (३) नाल्यामध्ये आरएमसीचे सांडपाणी जात असल्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका व इतरांकडून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान तक्रार प्राप्त झाली नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या महाराष्ट्र राज्यातील रेडीमिक्स काँक्रीट (आरएमसी) प्रकल्पांकरीता मार्गदर्शक तत्वांची नियमावली अधिसूचना दिनांक १०/११/२०१६ रोजी जारी करण्यात आलेली आहे. याअन्वये बँचिंग प्लान्ट वॉशिंग, ट्रान्झिट मिक्स्चर वॉशिंग, व्हेईकल टायर वॉशिंग आणि फ्लोअर वॉशिंग यातून निर्माण झालेले सांडपाणी योग्य अशा ड्रेनेज सिस्टीममधून जमा करुन त्यांच्यावर सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणेमध्ये प्रक्रिया करुन प्रक्रियायुक्त सांडपाणी प्रकल्पातील वॉटर स्प्रिंकलींग सिस्टीममध्ये व बागकाम यासाठी वापरण्यात यावे व प्रकल्पातून सांडपाणी कोठेही बाहेर सोडण्यात येऊ नये, असे निर्देशित केलेले आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून रेडीमिक्स कॉंक्रीट (आरएमसी) प्रकल्पांची वेळोवेळी पाहणी केली जाते व पाहणी दरम्यान दोषी प्रकल्पधारकांवर जल व हवा प्रदूषण नियंत्रण कायद्यांतर्गत कारवाई केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर येथे नवीन वसतिगृहाचे कार्यारंभ होणेबाबत

**(५३) * ३६१ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर येथे नवीन वसतिगृहाकरीता अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०१८ मध्ये रुपये १० कोटी मंजूर करण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतिगृहाचा विकास आराखडा सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांना मागील दिड वर्षापुर्वी देण्यात आला असून सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांच्याकडून विद्यापीठाच्या विकासकामाकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विकासकामाकरीता होत असलेल्या दिरंगाईबद्दल संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) नाही.

तथापि, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर येथे नवीन वसतिगृहाकरीता विद्यापीठाच्या साधारण निधीतून सन २०१७-२०१८ मध्ये विद्यापीठाच्या अर्थसंकल्पामध्ये रुपये १० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

(२) प्रस्तावित विद्यापीठाच्या वसतिगृहाच्या बांधकामाचा रुपये ४१,९६,६९,८२०/- इतक्या रकमेचा प्राथमिक आराखडा सार्वजनिक बांधकाम विभागाने विद्यापीठास दिला होता.

विद्यापीठाद्वारे वसतिगृहाच्या कामाचे विस्तृत आराखडे व अंदाजपत्रकाची सार्वजनिक बांधकाम विभाग यांना मागणी केली असून विस्तृत आराखडे व अंदाजपत्रक प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात प्रदूषण करणाऱ्या औद्योगिक वसाहतीमध्ये (क्लस्टर) तारापूर अग्रक्रमांकावर असल्याबाबत

**(५४) * ४९५ ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रदूषण करणाऱ्या औद्योगिक वसाहतीमध्ये (क्लस्टर) पालघर जिल्हयातील तारापूर अग्रक्रमांकावर असल्याचे राष्ट्रीय हरित लवादाकडून प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीतून निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील चंद्रपूर, औरंगाबाद, डोंबिवली, नाशिक, नवी मुंबई, चेंबूर व इतर ठिकाणाचा समावेश करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात होत असलेले प्रदूषण रोखण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) मा.राष्ट्रीय हरीत लवाद नवी दिल्ली यांनी मूळ अर्ज क्र. १०३८/२०१८ मध्ये दि. १०/०७/२०१९ रोजीच्या आदेशान्वये केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने सन २०१७-२०१८ मध्ये देशातील औद्योगिक क्षेत्रांचा सर्वसमावेशक पर्यावरण

मूल्यांकन केले असता १०० औद्योगिक क्षेत्रांचा प्रदूषित क्षेत्रे म्हणून आढळली आहेत. त्यामध्ये महाराष्ट्रातील तारापूर, चंद्रपूर, नाशिक, डोंबिवली, औरंगाबाद, नवी मुंबई, चेंबूर, पिंपरी-चिंचवड व महाड या ९ औद्योगिक क्षेत्रांचा समावेश करण्यात आलेला आहे.

राज्यातील सदर ९ औद्योगिक क्षेत्राचा व्यापक पर्यावरण प्रदूषण निर्देशांक सुधारण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सर्व भागधारकांसोबत बैठक घेऊन सर्वसमावेशक कृती आराखडा तयार केला असून तो केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळास सादर केला आहे.

मा.राष्ट्रीय हरीत लवाद, नवी दिल्ली यांच्या आदेशान्वये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर ९ औद्योगिक प्रदूषित क्षेत्रांची प्रदूषण वहन क्षमतेचा अभ्यास करण्याकरीता निरी या संस्थेला नियुक्त करण्यात आले आहे.

तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आदेशान्वये ९ औद्योगिक प्रदूषित क्षेत्रांची तपासणी करण्याकरिता त्रयस्थ NABL या मान्यताप्राप्त संस्थेला नियुक्त करण्यात आले असून सदर काम प्रगती पथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पार्ले आणि पार्लेवाडी (ता.पोलादपूर, जि.रायगड) दरम्यान वाहणारी सावित्री नदी प्रदूषित झाल्याबाबत

**(५५) * ९३ श्री.प्रसाद लाड, श्री.जयंत पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पार्ले आणि पार्लेवाडी (ता.पोलादपूर, जि.रायगड) दरम्यान वाहणाऱ्या सावित्री नदीत एका विषारी टँकरमधून अज्ञात केमिकल माफियांनी केमिकल सोडल्यामुळे नदी पात्रातील शेकडो मासे मृत्यूमुखी पडले असून प्रदूषित पाण्यामुळे नदीकिनाऱ्यालगतच्या नळ पाणीपुरवठा योजनेच्या जॅकवेलमध्ये प्रदूषित पाणी गेल्याने नळाद्वारे पाणीपुरवठा बंद करण्यात आल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सावित्री नदी परिसरातील अनेक गावांना या नदीपात्रातून पाणीपुरवठा केला जात असल्यामुळे तेथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून प्रदुषणामुळे नदीलगतच्या पार्ले, दिवील, वावे संवाद, धारवली, हावरे आदी गावातील ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी इतरत्र जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मेजर केमिकल झोन असलेल्या कोकणातील महाड औद्योगिक वसाहतीमध्ये अनेक केमिकल इंडस्ट्रीज असून या कारखान्यामधून उत्सर्जित होणारे रासायनिक घनकचरा आणि द्रवरूप केमिकल वेस्ट यांचे न्युट्रलायझेशन करण्याची प्रक्रिया खर्चिक असल्याने तसेच महाड एमआयडीसीतील सीइटिपीमध्ये सदर प्रक्रिया करण्याचे टाळण्यासाठी काही केमिकल इंडस्ट्रीज निर्जन भागात डोंगरदऱ्यांमध्ये टँकरद्वारे सातत्याने केमिकल ओतून अशा प्रकारच्या केमिकल्सची विल्हेवाट लावत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार घातक केमिकल नदीत सोडणाऱ्या केमिकल माफियांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

तालुका आरोग्य अधिकारी, पोलादपूर यांच्या अहवालानूसार खबरदारीचा उपाय म्हणून पाणीपुरवठा तात्पुरता बंद केला होता. पर्यायी व्यवस्था केल्यामुळे ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी इतरत्र जावे लागले नाही.

तद्नंतर जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, अलिबाग व तालुका आरोग्य अधिकारी, पोलादपूर यांनी सदर पाणी पिण्यास योग्य असल्याचा अहवाल दिल्यांनतर पाणीपुरवठा पुन्हा सुरळीत सुरु करण्यात आला होता.

(३) हे खरे आहे.

(४) मे.सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लि., महाड व मे.ॲस्टेक लाईफसायन्सेस लि., महाड (मे.संजीवनी पॅरेंटरल प्रा.लि., महाड) या दोन कंपन्यामधून कशेडी घाटामध्ये रासायनिक सांडपाणी सोडल्याचे निदर्शनास आले होते. सदर रासायनिक सांडपाणी

सोडणाऱ्या टँकर चालकाविरुध्द पोलीस स्टेशन, पोलादपूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सदर दोन्हीही उद्योगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक १२/०२/२०२० रोजी प्रस्तावित निर्देश बजावण्यात आले आहेत.

पार्लेवाडी परिसरातील सावित्री नदी पात्रामध्ये टाकाऊ रसायन सोडण्यात आलेल्या घटनेची दिनांक २८/१२/२०१९ रोजी पोलीस ठाणे, पोलादपूर यांच्या दैनंदिनीमध्ये नोंद घेण्यात आली असून सदर घटनेचा तपास पोलादपूर पोलीस ठाण्यामार्फत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हयातील वेरुळ-म्हैसमाळ-सुलीभंजन-खुलताबाद येथील पर्यटन विकास आराखड्याबाबत

**(५६) * ७७३ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील वेरुळ-म्हैसमाळ-सुलीभंजन-खुलताबाद येथे पर्यटन वाढीच्यादृष्टीने शासनाकडून दोन वर्षांपुर्वी रुपये ४३८ कोटी मंजूर झाल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाच्यावतीने सुलीभंजन येथे 'तारांगण' व म्हैसमाळ येथे अद्यावत रिसॉर्ट निधीतून बनविण्यात येणार असून सदर कामासाठी दोन वर्षापुर्वी मंजुरी मिळूनही निधी उपलब्ध न झाल्याने एकही काम सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) औरंगाबाद जिल्ह्यातील वेरुळ-म्हैसमाळ-सुलीभंजन-खुलताबाद येथील पर्यटन विकासाचा रुपये ४३८.४४ कोटीच्या ढोबळ आराखड्यास शासन निर्णय, दिनांक ३१/०३/२०१७ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

(२) व (३) सदर आराखड्यानुसार माहिती केंद्र, स्वच्छता गृह, वाहनतळ, पर्यटक निवास इत्यादीसाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्यामार्फत कार्यवाही करण्यात येत असून त्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास रुपये २.८० कोटी निधी वितरीत केला असून तो सदर कामावर खर्च झाला आहे. आराखड्यानुसार पर्यटन विभागामार्फत रुपये ३.३७ कोटी व इतर विभागांकडून (सार्वजनिक बांधकाम विभाग, वने) रुपये ५.७८ कोटी असा एकूण रुपये ९.१५ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून संबंधित यंत्रणामार्फत कामे चालू आहेत. उर्वरित निधी उपलब्धतेनुसार वितरीत करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुरबाड (जि.ठाणे) येथील शेतकऱ्याचा भात खरेदी करण्यास खरेदी विक्री संघाने नकार दिल्याबाबत

**(५७) * १३३९ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) खरेदी-विक्री संघाने शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करुन श्री.दिपक ठाकरे या शेतकऱ्याचा भात खरेदी करण्यास नकार दिल्याचे माहे डिसेंबर, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देऊन त्यांना चिंतामुक्त करण्याचा प्रयत्न महाविकास आघाडी सरकार करत असताना सदरहू शेतकऱ्याचा भात खरेदी करण्यास भात खरेदी केंद्राने नकार दिल्याने व्यथित होऊन श्री.ठाकरे यांनी परिवारास लागणाऱ्या भाताव्यतिरिक्त

उर्वरित भात तहसिलदार कार्यालयासमोर पेटवून देण्याचे निवेदन तहसिलदार, मुरबाड आणि खरेदी-विक्री संघ, मुरबाड व पोलीस स्टेशन, मुरबाड यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवकाळी पावसाने संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कार्यवाही करुन शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.

श्री.दिपक ठाकरे यांनी शासकीय धान खरेदी केंद्रावर आणलेल्या धानापैकी एफएक्यू दर्जाच्या १७.०९ क्विंटल धानाची खरेदी आधारभुत खरेदी किंमत दराने करण्यात आलेली आहे. उर्वरित १६ पोती धान एफएक्यू दर्जाचा नसल्याने खरेदी करण्यात आला नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) माहे ऑक्टोबर, २०१९ दरम्यान अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणेबाबत शासनाने निर्देश दिले आहेत. त्यानुसार मुरबाड तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या यादीतील अ.क्र.१९ वर श्री.दिपक जिवन ठाकरे, मु.कोलठण, ता.मुरबाड यांचे नावाची नोंद असून त्यांना रुपये ९५२०/- इतक्या नुकसान भरपाईची रक्कम ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, शाखा मुरबाड या बँकेच्या धनादेशाद्वारे अदा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिक्षण विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द दप्तर दिरंगाई कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्याबाबत

**(५८) * ७१० श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दप्तर दिरंगाई कायद्यातील तरतुदीनुसार आपले कर्तव्य व जबाबदारी पार न पाडणाऱ्या शिक्षण विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचेविरूध्द कठोर स्वरूपाची दंडात्मक कारवाई करण्याबाबत नागपूर विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मुख्य सचिव, अप्पर मुख्य सचिव, शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालक (प्राथ/माध्य) यांना पाठवून दोषी अधिकाऱ्यांविरूध्द कठोर स्वरूपाची दंडात्मक कारवाई करण्याची मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) दिनांक २२ ऑक्टोबर, २०१९ रोजी व त्यासुमारास असे निवेदन शासनास वा क्षेत्रियस्तरावर प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची पाणीपुरवठा योजना अपुर्णा अवस्थेत असल्याबाबत

**(५९) * ७५२ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत असलेल्या ६९ गावांची पाणीपुरवठा योजना वर्षानुवर्षे अपुर्णावस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून तत्कालीन शासनाने दिनांक ३१ मार्च, २०१९ पर्यंत कामे पूर्ण होऊन गावांचा पाणीपुरवठा सुरु होईल असे आश्वासित केले होते परंतु सर्व कामे अपुर्णावस्थेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ६९ गावांच्या पाणीपुरवठा योजनामध्ये समाविष्ट असलेल्या गावांना सुर्या व पेल्हार धरणातून २२ दशलक्ष लिटर करण्यात येणारा पाणीपुरवठ्याचे काम प्रलंबित असल्याने करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेंतर्गत गोखिवरे, चिंचोटी, कामण, चंद्रपाडा, देवदळ, राजावली, उमेळे, वासळई, नायगांव, खोचिवडे, वाघोली, नाळे, तरखड या गावांमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने जलवाहिन्या टाकण्याचे व जलकुंभ बांधण्याचे काम पूर्ण केले असून काही ठिकाणी नविन जलवाहिन्या खरेदी करण्याचे प्रस्ताव प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त जलवाहिन्या व जलकुंभाचे काम देखील निकृष्ट दर्जाचे झाले असून त्यामध्ये सतत बिघाड होऊन गळती होत असल्याने सदर प्रकरणी लोकप्रतिनिधींनी संबंधित विभागाकडे वारंवार पत्रव्यवहार करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वसई-विरार शहरासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या ६९ गावांच्या पाणीपुरवठा योजनेकरीता एक कालबध्द आणि नियोजनबध्द कार्यक्रम आखून पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०१४ अखेर योजनेची ९८% कामे पूर्ण करण्यात आली होती. तथापि, वसई-विरार शहर महानगरपालिकेकडून पाणी उपलब्ध न झाल्याने सदर योजना कार्यान्वित करणे शक्य झाले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

सदर योजनेंतर्गत या गावांमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत जलवाहिन्या टाकण्याचे व जलकुंभ बांधण्याचे काम पूर्ण करुन योजना कार्यान्वित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

नवीन जलवाहिन्या खरेदी करण्याचा कुठलाही प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे प्रलंबित नाही.

(४) हे खरे नाही.

(५) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून आवश्यक नियोजन व कालबध्द कार्यक्रम आखून योजनेचे ९८% काम पूर्ण करण्यात आले आहे. योजनेतील वितरण व्यवस्था व मुख्य जलवाहिन्या जोडून ७ ते ८ वर्षांचा कालावधी झालेला आहे. तथापि, वसई-विरार शहर महानगरपालिकेकडून करण्यात आलेल्या, रस्ते रुंदीकरण, गटारे बांधणे, क्रॉस ड्रेनेज, स्थानिक विकास कामे, एम.एम.आर.डी.ए. ची विकास कामे इत्यादी कामांमुळे वितरण व्यवस्था व मुख्य जलवाहिन्यांची अनेक ठिकाणी तुटफूट / नासधूस झाल्याने त्या वारंवार दुरुस्त कराव्या लागल्या. तसेच माहे ऑक्टोबर, २०१७ ते डिसेंबर, २०१८ या दरम्यान टप्प्या-टप्प्याने महानगरपालिकेकडून त्यांच्या मुख्य जलवाहिनीवरुन नळ जोडण्यांची परवानगी प्राप्त झाल्यानंतरही पाण्याच्या वेळेची अनिश्चितता व कमी दाब यामुळे योजना कार्यान्वित करण्यामध्ये अडचणी येत आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिक्षण हक्क कायदयानुसार खाजगी शिक्षण संस्थामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६०) * ११९५ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाल्याचे भवितव्य उज्वल व्हावे त्यांना प्रगतीच्या युगामध्ये राहता यावे यासाठी इंग्रजी विषयाचे ज्ञान असणे आवश्यक असल्याने पालकांचा इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे कल वाढत असून बीड जिल्हयामध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे प्रमाण जास्त असून अनेक शाळा शिक्षण विभागाच्या परवानगीशिवाय सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयामध्ये १९८ युडीआयएस कोड प्राप्त शाळा असून यामध्ये विनाअनुदानित मराठी शाळांचा देखील समावेश असल्याने उर्वरित शाळांनी युडीआयएस कोड न काढल्यामुळे शाळांची जिल्हा परिषद किंवा शिक्षण विभागाच्या दप्तरी नोंद नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण हक्क कायदयानुसार (आर.टी.ई.) जिल्हयातील बऱ्याच विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले असून शाळेतील शिक्षणाच्या निकृष्ट दर्जामुळे विद्यार्थ्यांना शाळा सोडाव्या लागल्या परंतु शासनामार्फत मुलांच्या नावे आलेला निधी संस्थाचालक वापर करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शाळा सोडुन गेलेल्या विद्यार्थ्यांच्या नावे आलेला करोडो रुपयांचा निधी वापरण्यामागे संस्थाचालक, जिल्हा परिषद, शिक्षण विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचे संगनमत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संस्थाचालक, आर.टी.ई.कायदयांतर्गत निधीचा गैरवापर करणाऱ्या संस्थाचालकांवर व अधिकारी कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रंथालयांना दर्जावाढ देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६१) * १४१ श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४६८९१ ला दिनांक २० जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अ,ब,क आणि ड वर्गाची १२८६१ ग्रंथालये असून त्यापैकी ४०५१ ग्रंथालये मराठवाड्यात आहेत तसेच राज्यात सार्वजनिक ग्रंथालयात १२४७७ कर्मचारी काम करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षापासून शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना दर्जावाढ दिली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मा.व्यंकपा पत्की समितीच्या अहवालाप्रमाणे राज्यातील ग्रंथालयांना दर्जा वाढ देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) राज्यात अ,ब,क आणि ड वर्गाची दिनांक ३१ मार्च, २०१९ अखेर एकूण १२,१४९ ग्रंथालये आहेत. त्यापैकी ४०५० ग्रंथालये औरंगाबाद विभागात आहेत. राज्यातील एकूण १२,१४९ ग्रंथालयात आकृतिबंधानुसार २१,६१५ कर्मचारी आहेत.
(२) दिनांक ०६ मार्च, २०१३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दिनांक २२ मार्च, २०१३ निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षापासून शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना दर्जोन्नती देण्याची प्रक्रिया स्थगित आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पांढरकवडा (जि.यवतमाळ) केंद्रावर शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी होत नसल्याबाबत

**(६२) * १११४ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथे शालेय पोषण आहारात जुन्या योजनेनुसार शालेय पोषण आहाराचे वाटप होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शालेय पोषण आहारात ज्वारी, बाजरी व नाचणीचे पदार्थ विद्यार्थ्यांना देण्यात यावी अशी शासनाची योजना आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शालेय पोषण आहार केंद्राकडून सदर योजनेची अंमलबजावणी होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१), (२), (३) व (४) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत ज्वारी, बाजरी व नाचणीचा समावेश करण्याचे निर्देश केंद्र शासनाने दिले आहेत. त्यानुषंगाने ज्वारी, बाजरी व नाचणीची मागणी नोंदविण्याबाबत सर्व जिल्ह्यांना कळविण्यात आले होते. तथापि, जिल्ह्यांकडून परिपूर्ण माहिती व मागणी प्राप्त झाली नसल्याने याबाबतची मागणी केंद्र शासनाकडे करण्यात आलेली नाही. सदर पदार्थ स्वेच्छा तत्वावर मागणी करण्याचे प्रयोजन आहे. मात्र जुन्या पध्दतीप्रमाणे तांदळाची मागणी सुरु आहे.

-----------------

## संगमेश्वर (जि.रत्नागिरी) येथील गावकऱ्यांच्या समस्या सोडविण्याबाबत

**(६३) * ९८२ श्री.रामदास कदम :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील शास्त्री व सोनवी नदीत गाळासोबत प्लास्टिकच्या कचऱ्याच्या समस्यांना स्थानिक गावकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्लास्टिक वापराबाबत शासनाने कडक नियम केले असताना देखील संगमेश्वर सहीत महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये सदर कायद्याचे स्थानिक प्रशासनाच्या मदतीने उल्लंघन होत असून संगमेश्वर एस.टी. बस स्थानकाच्या शौचालयातील सांडपाणी थेट नदीत सोडले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दूषित पाण्यामुळे स्थानिक ग्रामस्थांच्या आरोग्याला निर्माण होणारा धोका टाळण्यासाठी कार्यवाही करुन प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हयाच्या राईस मिलमध्ये केंद्र शासनाकडील तांदूळसाठा आढळल्याबाबत

**(६४) * २८१ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्हयातील वेअर हाऊसला केंद्र शासनाने पाठविलेला तांदूळसाठा पालघर जिल्हयाच्या एका राईस मिलमध्ये आढळल्याचे माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार संबंधित दोषी व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विषयनिहाय शिक्षकांची पदे संपुष्टात आल्याबाबत

**(६५) * ९४२ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संचमान्यतेचे निकष बदलून भाषा, गणित तसेच विज्ञान या विषयनिहाय शिक्षकांची पदे दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ च्या शासन निर्णयान्वये संपुष्टात आणली असून कला, क्रीडा व संगीत शिक्षकांची पदे व्यपगत केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संचमान्यतेचे निकष बदलल्याने अतिरिक्त शिक्षकांची संख्या वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाकरीता संचमान्यतेचे निकष शिथील करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षक/ कर्मचाऱ्यांना कॅशलेस योजना लागू करण्याबाबत

**(६६) * २३० श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४४३९३ ला दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षक/ कर्मचाऱ्यांना वैदयकीय खर्चाची देयके मंजूर करण्याच्या प्रक्रियेऐवजी कॅशलेस स्मार्टकार्ड योजना लागू करण्याबाबत शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१), (२) व (३) राज्यातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॅशलेस आरोग्य योजना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## मुंबईत कफ सिरपची अवैधरित्या विक्री होत असल्याबाबत

**(६७) * १७५४ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत कफ सिरपचा नशेसाठी अधिक वापर होत असून त्याची विक्री वाढत असल्याने विक्री करणाऱ्यांवर पोलीस आणि अन्न व औषध प्रशासन (एफडीए) कडून कारवाई करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१९ मध्ये मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने ७ हजार कफ सिरपच्या बाटल्या हस्तगत करुन अकरा जणांना अटक केली असून अन्न व औषध प्रशासनाकडून केवळ तीन प्रकरणांवरच कारवाई केली असून जप्त केलेला कफ सिरपचा साठाही नगण्य असल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कफ सिरपच्या बेकायदा होणाऱ्या विक्रीवर नियंत्रण घालण्यासाठी कार्यवाही करुन संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सन २०१९ मध्ये मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाकडून ७५७७ कफ सिरपच्या बाटल्या हस्तगत करून १३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

तर, अन्न व औषध प्रशासनाव्दारे सन २०१९ मध्ये कफ सिरपच्या बेकायदेशीर/अवैध विक्री प्रकरणी १५ प्रकरणात पोलिसांकडे प्रथम खबर अहवाल दाखल करण्यात आलेला आहे तर ०२ व्यक्तींना पोलिसांनी अटक केलेली आहे.

(३) औषध विक्री पेढ्यांकडून कफ सिरपची विक्री डॉक्टरांच्या चिठ्ठीनुसार व औषधे सौंदर्य प्रसाधने कायद्यातील तरतुदीनुसार होते किंवा नाही याबाबतची नियमितपणे पडताळणी अन्न व औषध प्रशासनातील अधिकाऱ्यांकडून करण्यात येते. तपासणीवेळी आढळून आलेल्या उल्लंघनाच्या अनुषंगाने पेढीविरूध्द औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथे पाली विद्यापीठाची निर्मिती करण्याबाबत

**(६८) * २१२५ श्री.प्रकाश गजभिये : तारांकित प्रश्न क्रमांक ४७९५९ ला दिनांक २० जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पाली बौध्द विद्यापीठ नसल्याने नागपुरात पाली बौध्द विद्यापीठाची १०० एकराच्या जागेत निर्मिती करून सर्व कर्मचारी, प्राध्यापक सहित ग्रांटेड पाली बौध्द विद्यापीठाची निर्मिती करण्याची मागणी राज्यातील विविध आंबेडकरी संघटनांनी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाली बौध्द विद्यापीठ निर्माण करण्याच्या मागणीसाठी मागील हिवाळी अधिवेशन, २०१७ व पावसाळी अधिवेशन, २०१८ मध्ये भव्य मोर्चा काढण्यात येवून मोर्चेकऱ्यांनी पाली बौध्द विद्यापीठ विलंब न करता निर्माण करण्याची मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपुरच्या पवित्र दीक्षा भूमी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सन १९५६ साली पाली भाषेत दीक्षा घेतली असून पाली भाषेला बुध्द धर्मात फार महत्त्व आहे, तसेच भगवान बुध्दांनी सुध्दा पाली प्राकृत भाषेत धम्माचा प्रचार-प्रसार केला असून पाली भाषा अनेक भाषांची जननी असल्याने पाली बौध्द विद्यापीठ निर्माण करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री महोदयांना निवेदनाव्दारे करण्यात आली, त्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेवून निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागपूर येथे पाली विद्यापीठाची निर्मिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) सद्य:स्थितीत राज्यातील अकृषी विद्यापीठामध्ये पाली भाषेचे अभ्यासक्रम सुरु आहेत. पाली विद्यापीठाची स्थापना करण्याबाबत निर्णय झालेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हयातील लाभार्थी स्वच्छ भारत मिशन अंतर्गत अनुदानापासून वंचित असल्याबाबत

**(६९) * ४१० श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील ग्रामीण भागात सन २०१२-२०१३ ते २०१८-२०१९ पर्यंत स्वच्छ भारत मिशन अंतर्गत १२ तालुक्यातील २६,२९५ कुटूंबांना प्रत्येकी एक शौचालय मंजूर करण्यात येवूनही डिसेंबर अखेरपर्यंत बांधकाम पूर्ण करावयाचे असल्याने मुदतीत बांधकाम पूर्ण न झालेल्या ५,४४५ शौचालयाचे लाभार्थी अनुदानापासून वंचित असल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर वंचित लाभार्थ्यांना अनुदान मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ पर्यंत एकूण १७,६८६ लाभार्थ्यांनी शौचालय बांधकाम पूर्ण केले असून, त्यापैकी १३,३३३ लाभार्थ्यांना प्रोत्साहन अनुदान वितरीत करण्यात आले आहे. उर्वरित लाभार्थींना अनुदान वाटपाची प्रक्रिया चालू आहे.

(२) उर्वरित १२,९६२ लाभार्थ्यांना प्रोत्साहन अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही क्षेत्रियस्तरावरून करण्यात येत असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्ह्यात धान खरेदी केंद्राच्या माध्यमातून खरेदी केलेल्या धानाची भरडाई न झाल्याबाबत

**(७०) * ४९९ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.परिणय फुके : दिनांक १८ डिसेंबर, २०१९ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक ४८४३५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातील मार्केटिंग फेडरेशनच्या माध्यमातून ६६ धान खरेदी केंद्रावर ११ लाख क्विंटल धान खरेदी करण्यात आला असून खरेदी केलेल्या धानाची भरडाई न केल्याचे तसेच अवकाळी पावसामुळे धान खराब होण्याची शक्यता असल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर धानाची भरडाई माहे डिसेंबर, २०१९ पर्यंत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.

शासकीय आधारभूत धान खरेदी योजनेंतर्गत हंगाम २०१८-२०१९ मध्ये गोंदिया जिल्ह्यातील सहकारी संस्थेच्या ५७ धान खरेदी केंद्रामार्फत २८,८९,६९०.०३ क्विंटल धान खरेदी करण्यात आले आहे. या हंगामात १६२ मिलर्सनी भात भरडाईचा करारनामा केला आहे. सदर मिलर्सना जिल्हा मार्केटिंग कार्यालयामार्फत दिनांक ३०/११/२०१९ अखेर धानाचे डि.ओ. देण्यात आलेले आहेत. सदर मिलर्सनी २८,६२,४७०.८० क्विंटल धानाची प्रत्यक्ष उचल करुन त्याचा १९,१७,८६९.४० तांदुळ (CMR) दिनांक ३०/११/२०१९ पर्यंत शासनास जमा केला आहे.

जिल्हा पुरवठा अधिकारी, गोंदिया व मार्केटिंग फेडरेशन यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार कळविले आहे. हंगाम २०१९-२०२० मध्ये दिनांक ०३ जानेवारी, २०२० पर्यंत ११,३३,५४८.९७ क्विंटल धानाची खरेदी झाली असून सदर सर्व धान सुरक्षित साठवणुक करण्यात आला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई सेंट्रल येथील 'महाराष्ट्र वाहतूक भवन' येथे उद्वाहन दुरुस्ती करीत असताना कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्याबाबत

**(७१) * २१८ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे मुख्यालय असलेल्या मुंबई सेंट्रल येथील 'महाराष्ट्र वाहतूक भवन' येथे उद्वाहन दुरुस्ती करीत असताना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचारी श्री.रामानंद पाटकर यांचा दिनांक २७ डिसेंबर, २०१९ रोजी दुर्दैवी मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार मयत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचारी श्री.रामानंद पाटकर यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाईपोटी आर्थिक मदत देण्याबाबत तसेच कुटुंबातील सदस्याला महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात अनुकंपा तत्त्वावर नोकरीत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) श्री.रामानंद पाटकर यांचा दुर्दैवी मृत्यू झाला, हे खरे आहे. मात्र उद्वाहन दुरुस्त करीत असताना मृत्यू झाला, हे खरे नाही.

(२) सदर दुर्घटनेची चौकशी पोलीस यंत्रणा, विद्युत निरीक्षक (उद्वाहने) व उद्योग ऊर्जा व कामगार विभाग यांचेमार्फत सुरु असून, महामंडळाच्या दिनांक २८/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये कै.पाटकर यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाईपोटी आर्थिक मदत म्हणून रुपये ५,६५,७२०/- इतक्या रकमेचा धनादेश

आयुक्त, श्रमिक नुकसान भरपाई तथा (कामगार न्यायालय), मुंबई यांचेकडे पाठविण्यात आला आहे व सदर पत्राची प्रत कै.पाटकर यांचे पत्नीस देण्यात आली आहे. तसेच कै.पाटकर यांच्या मुलाला राज्य परिवहन महामंडळामध्ये अनुकंपा तत्वावर लेखाकार या पदी नेमणूक दिलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे आणि बारामती प्रादेशिक परिवहन विभागांमध्ये (आरटीओ) सेन्सर असलेले संगणकीकृत ट्रॅक बंद असल्याबाबत

**(७२) * १०८२ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे आणि बारामती प्रादेशिक परिवहन विभागामध्ये (आरटीओ) सेन्सर म्हणजे संवेदक असलेले संगणकीकृत ट्रॅक मागील वर्षभरापासून देखभालीअभावी बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहनचालक परवाना देण्याच्या प्रक्रियेतील मानवी हस्तक्षेप टाळण्यासाठी बसविण्यात आलेले सेन्सर ट्रॅक बंद असण्यामागची कारणे काय आहेत, तसेच राज्यात "बारामती पॅटर्न" राबविण्याचा आरटीओचा हेतू साध्य न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्‌नुसार बंद असलेले संगणकीकृत ट्रॅक सुरु करण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) हे अंशतः खरे आहे.

सीआयआरटी यांचे मालकीचा भोसरी, पुणे येथील सेंसरयुक्त चाचणी पथ सुस्थितीत असून सदर ठिकाणी प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे या कार्यालयामार्फत चाचणी घेण्यात येत आहे. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, बारामती येथील स्वयंचलीत चाचणी पथ सद्य:स्थितीत बंद आहे.

(२) व (३) उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, बारामती येथील स्वयंचलीत चाचणी पथाचे कार्यान्वयन, देखभाल व दुरुस्तीसाठी नियुक्त केलेल्या सेवापुरवठादाराकडून समाधानकारक सेवा प्राप्त न झाल्यामुळे सदर चाचणी पथावरील सेंसर बंद आहेत. तथापि, सेंसर बंद असले तरी मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम १५ मधील तरतुदीनुसार कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षक व सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक यांचेमार्फत त्याच चाचणी पथावर अचूक व काटेकोरपणे चाचणी घेण्यात येत आहे.

तसेच उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बारामती येथील स्वयंचलीत चाचणी पथाचे सेंसर तात्काळ चालू करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याबाबत संबंधितांना शासनाने आदेश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या गणवेश वाटपात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(७३) * २४ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाने कर्मचाऱ्यांच्या गणवेश कापडासाठी रुपये ७.५० कोटी व शिलाई भत्ता यासाठी रुपये ७.५० कोटी असे रुपये १५ कोटी खर्च केले होते, सदर पध्दत बंद करुन कर्मचाऱ्यांना महामंडळातर्फे २ गणवेश देण्यासाठी खाजगी कंत्राटदाराशी साधारणत: रुपये ६४ कोटीचा करार केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील ३ वर्षापासून कर्मचाऱ्यांना गणवेश न मिळाल्याने सुमारे ६४ कोटींचा गैरव्यवहार झाल्याची शक्यता निर्माण झाली असून कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‍नुसार राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या गणवेशात झालेल्या गैरव्यवहाराबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) हे खरे आहे.

सदर खर्च हा सन २०१५-२०१६, २०१६-२०१७ व २०१७-२०१८ या ३ वर्षासाठी असून तो प्रतिवर्ष रुपये २१.६७ कोटी एवढा आहे.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील सर्व विभागातील गणवेश पात्र कर्मचाऱ्यांनी त्यांच्या साईजनुसार व संवर्गनिहाय माहिती कळविल्याप्रमाणे एकूण ०४ गणवेश संचापैकी ०२ गणवेश संचाचे वितरण करण्यात आले असून, उर्वरित ०२ गणवेश संचाचा संपूर्ण पुरवठा मे.गुणिणा कमर्शियल कॉर्पोरेशन, मुंबई या पुरवठादाराने केला असून, गणवेश वितरणाचे काम चालु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद सिडको बस स्थानक येथे बस पोर्ट बांधण्याबाबत

**(७४) * ७८४ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद सिडको बस स्थानक येथे बस पोर्ट बांधण्याबाबत निर्णय होऊन बस पोर्टचे दोन महिन्यांपुर्वी तत्कालीन मा.परिवहन मंत्री यांच्या हस्ते भुमीपूजन करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बस पोर्टचे काम सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकल्पाकरीता विकासकाची निवड करण्यात आली असून, त्यांना दिनांक ०४/०९/२०१९ अन्वये स्वीकृतीपत्र देण्यात आले आहे. सद्य:स्थितीत विकासकरार करण्यासाठी बांधकाम परवानगी मिळणेकरीता विकासकाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

# ठाणे शहरात बनावट नंबर प्लेट लावून वाहने चालविली जात असल्याबाबत

**(७५) * १३४१ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डिजिटल व्यवहाराला शासनाकडून चालना दिली जात असताना नियम मोडणाऱ्या वाहन चालकांवर ई-चलनाद्वारे दंड आकारण्याची कारवाई ठाणे शहरात माहे डिसेंबर, २०१९ पासून सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे शहरात एम.एच.०४ केसी ४१२५ या वाहनचालकाने वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याने त्याला दिनांक १० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास ई-चलन पाठविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणामध्ये वाहतूक नियमांचे उल्लंघन केलेल्या बनावट वाहनचालकास दंड आकारणी न होता मूळ वाहनचालक (मूळ नंबर प्लेटच्या गाडीचा मालक) यांना ई-चलन गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, राज्यातील मुंबई वाहतूक पोलिसांकडे अचूक पुरेपूर तपशील नसल्याने ४० टक्के वाहन मालक ई-चलन कारवाईच्या बाहेर असल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले असून ई-चलन प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने शासनाचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बनावट नंबर प्लेटधारकांचा शोध घेण्यासाठी तसेच ई-चलन राबविताना वाहनधारकांना नियम अटी माहिती होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) ते (५) ठाणे शहर वाहतूक विभागामार्फत दिनांक १४/०२/२०१९ पासून वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या कसुरदार वाहन चालकांचे विरूध्द ई-चलनव्दारे कारवाई करण्यात येत आहे.

वाहन क्र. एम.एच.०४ केसी ४१२५ या वाहनाचे नंबर प्लेट अस्पष्ट असल्याने सदरचे चलन जारी करण्यात आले होते. तथापि, सदर प्रकरणी पोलीस उपआयुक्त, वाहतूक विभाग येथे तक्रार प्राप्त झाल्यावर सी.सी.टी.व्ही. फुटेजची पडताळणी करुन सदरची कारवाई संशयित असल्याने जारी केलेले ई-चलन रद्द करण्यात आले व कसुरदार वाहन क्र. एम.एच.०४ केसी ४९२५ या वाहन चालकावर नव्याने ई-चलन पाठविण्यात आले.

परिवहन विभागाच्या https://vahan.nic.in पोर्टलद्वारे सर्व वाहनांची व वाहनांच्या मालकांची अद्ययावत माहिती वेळोवेळी प्राप्त करण्यात येते. तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांच्या मालकांना त्यांच्या मोबाईल क्रमांकावर एस.एम.एस. च्या स्वरुपात ई-चलान पाठविण्यात येते.

ई-चलान कार्य प्रणालीमध्ये मुंबई शहरातील सर्व वाहन चालक/मालकांचे नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक बाबतची माहिती अद्ययावत करण्यात येते. तसेच वाहतूक पोलीस अंमलदार यांचेकडून वाहन चालक/मालक यांचे नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक ई-चलान डीवाईसद्वारे अद्ययावत केली जाते.

-----------------

## विक्रमगड-वाडा (जि.पालघर) तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या वसतिगृहात विद्यार्थ्यांना सोयी सुविधा मिळत नसल्याबाबत

**(७६) * ८२१ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड-वाडा (जि.पालघर) शहरालगत असलेल्या शीळ-झडपोली शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या वसतिगृहात विद्यार्थीनींना मुलभूत सोयी सुविधा मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोटयवधी रुपये खर्च करुन बांधण्यात आलेले वसतिगृह मागील दोन वर्षापासून बंद अवस्थेत असून उक्त वसतिगृहात मुलभूत सोयी सुविधा मिळत नसल्याने महाविद्यालयात येणाऱ्या विद्यार्थीनींची संख्या कमी झाल्याचे शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कारवाई करुन उक्त महाविद्यालयात सोयी सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

(२) शासकीय तंत्रनिकेतन, विक्रमगड मधील वसतिगृहामध्ये विद्यार्थीनींकरीता खोल्यांमध्ये पलंग व कपाटे, नियमित विद्युत व पाणीपुरवठा अशा सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच सुरक्षिततेच्यादृष्टीने पहारेकरी, स्वच्छतेकरीता सफाईगार तसेच वसतिगृहाकरीता कुलमंत्री व गृहपाल नेमण्यात आले आहेत.

विद्यार्थीनींचे प्रवेश कमी असल्याने, नियमानुसार मेसकरीता निविदा मागविण्यात आल्या होत्या. तथापि, संबंधितांकडून निविदा प्राप्त झाल्या नसल्याने, मेस सुरु करणे शक्य झालेले नाही. परंतु, स्थानिकरित्या संबंधित संस्थेतील विद्यार्थीनींकरीता भोजनाची सोय करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यात बनावट नंबर टाकून अनधिकृत रिक्षा चालविल्या जात असल्याबाबत

**(७७) * १२२४ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेलंगणा येथे निकामी ठरलेल्या अ‍ॅपे रिक्षांना यवतमाळ जिल्ह्यात कमी किंमतीत विकत आणून त्याद्वारे प्रवासी वाहतूक केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्षा बनावट नंबर टाकून अनधिकृतपणे चालविल्या जात असून चालकांकडे वाहनांची कागदपत्रेही उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रिक्षाचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**अ‍ॅड. अनिल परब :** (१) हे खरे नाही.

तेलंगणामधून महाराष्ट्रात विना नोंदणी/बनावट नंबर प्लेट लावून चालणाऱ्या ऑटोरिक्षा तपासणीत आढळून आलेल्या नाहीत.

मात्र, अशा आशयाची बातमी दिनांक ०१ जानेवारी, २०२० रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

दिनांक ०१/०४/२०१९ ते दिनांक ३१/०१/२०२० या कालावधीत २३१ ऑटोरिक्षांवर कारवाई करण्यात आलेली असून ९९ ऑटोरिक्षा अटकावून ठेवण्यात आलेल्या आहे. सदर कारवाईतून रुपये ५,६१,०००/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे. यवतमाळ जिल्ह्यातील विना नोंदणी केलेल्या ११ दोषी वाहनांवर कार्यवाही करण्यात आली असून विनापरवाना/क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक करणाऱ्या ऑटोरिक्षांविरुध्द वायुवेग पथकामार्फत नियमित कारवाई करण्यात येते.

त्याचप्रमाणे पोलीस विभागाकडून यवतमाळ जिल्ह्यात एकूण १९०७ दोषी ऑटोरिक्षांवर कारवाई करण्यात आलेली असून सदर कारवाईतून रुपये ३,९२,५००/- इतके तडजोड शुल्क वसूल करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भावली (ता.शहापूर, जि.ठाणे) नळ पाणीपुरवठा योजना उच्चाधिकार समितीच्या मान्यतेअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(७८) * २०७६ श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील टंचाईग्रस्त ९७ गावांसाठी इगतपुरी येथील भावली धरणाच्या पाण्यावर आधारित असलेली भावली नळ पाणीपुरवठा योजना ठाणे जिल्हा परिषदेने शासनाकडे सन २०१६-२०१७ मध्ये मान्यतेसाठी प्रस्तावित केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसंपदा विभागाने योजनेसाठी १२.६९ दलघमी पाण्याच्या आरक्षणाची मान्यता देऊन त्याबाबतचा शासन निर्णय, दिनांक २३ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निर्गमित केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाच वर्षे इतका कालावधी होऊनही मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीस्तरावर या योजनेची प्रशासकीय मान्यता प्रलंबित असून सदर योजनेस प्रशासकीय मान्यता न देण्याची कारणे काय आहेत व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील टंचाईग्रस्त ९७ गावांसाठी इगतपूरी येथील भावली धरणाच्या पाण्यावर आधारित नळ पाणीपुरवठा योजनेचा दरडोई खर्च विहित निकषापेक्षा अधिक असल्याने, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या दिनांक ०१/०८/२०१४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार मा.मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता यांच्या अध्यक्षतेखालील गठित उच्चाधिकार समितीने दिनांक ०४/०२/२०२० रोजीच्या बैठकीत मान्यता दिलेली आहे.

-----------------

## राज्यातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीचा लाभ मिळणेबाबत

**(७९) * ९६४ श्री.कपिल पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेचे स्वरूप काय आहे, तसेच शासनाने किती विद्यार्थ्यांना याचा लाभ दिला असून या योजनेवर किती खर्च करण्यात आला आहे ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय, क्र.टीईएम-२०१६/ प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक १५ एप्रिल, २०१७ अन्वये सदरहू योजनेचे नाव सन २०१७-२०१८ पासून "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना" ऐवजी "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" असे करण्यात आले आहे.

(२) राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत शासकीय, शासन अनुदानित व खाजगी विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठात विनाअनुदानित चालविल्या जाणाऱ्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्काची ५० टक्के रक्कम शिष्यवृत्ती स्वरुपात देण्यात येते.

सन २०१८-२०१९ पासून शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा ८.०० लक्ष इतकी करण्यात आली आहे. तसेच सन २०१८-२०१९ पासून महाडिबीटी पोर्टलच्या माध्यमातून शिष्यवृत्तीची रक्कम पात्र विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात थेट जमा करण्यात येत आहे.

शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मध्ये ३.५२ लक्ष लाभार्थ्यांना रुपये ६६४.९७ कोटी व शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये २.१६ लक्ष लाभार्थ्यांना रुपये २५६.२९ कोटी इतकी रक्कम वितरीत करण्यात आली आहे. तसेच मागील वर्ष व चालू वर्ष मिळून दिनांक १४ फेब्रुवारी, २०२० अखेर एकूण ५.६८ लक्ष लाभार्थ्यांना रुपये ९२१.२६ कोटी इतकी रक्कम वितरीत करण्यात आली आहे.

-----------------

## गोरेगाव (मुंबई) परिसरात नामांकित कंपन्यांच्या दुधात भेसळ होत असल्याबाबत

**(८०) * १७६९ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव, मुंबई येथील भगतसिंग नगरमध्ये एक महिला व तिच्या तीन साथीदारांना अमूल गोल्ड आणि अमूल ताजा या कंपनीच्या पिशव्या कात्रीने फाडून त्यामध्ये पाणी, पावडरची भेसळ करीत १३९ लिटर भेसळयुक्त दुध आणि त्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त करुन पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट १२ च्या पथकाने दिनांक ०९ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास छापा टाकून अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी नामांकित कंपनीच्या बनावट पिशव्याही जप्त करण्यात आल्या असून आरोपींनी चौकशीमध्ये दिलेल्या माहितीनुसार गोरेगाव मधील हनुमाननगरमध्ये दुधात भेसळ करणाऱ्या अन्य चार आरोपींना देखील अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नामांकित कंपन्यांच्या दुधामध्ये भेसळ करणाऱ्यांविरुध्द कारवाई करुन दुध भेसळ रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे :** (१) अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी व गुन्हे प्रकटीकरण शाखा, दहिसर येथील पोलिसांनी संयुक्तपणे सदरची कारवाई केलेली असून, सदर कारवाई दरम्यान ७८ लिटर दुधाचा साठा जप्त केलेला असून ०२ जणांना पोलिसांनी अटक केलेली आहे.

(२) अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी व गुन्हे प्रकटीकरण शाखा, दहिसर येथील पोलिसांनी संयुक्तपणे जुने हनुमाननगर, गोरेगाव येथील घरातुन गोकुळ क्लासिक पाश्चराईजड फुल क्रीम मिल्क दुधाच्या ६० बॅगा व अमुल गोल्ड पाश्चराईजड दुधाच्या ७५ बॅगा टेम्परिंग केल्याच्या संशयावरून जप्त केलेल्या आहेत. सदर कारवाई दरम्यान ०२ जणांना पोलिसांनी अटक केलेली आहे.

(३) या प्रकरणी चौकशी करण्यात आली असून, सदर दोन्ही प्रकरणातील आरोपीविरूध्द भारतीय दंड विधानातील कलमान्वये तसेच अन्न सुरक्षा व मानदे कायद्यातील कलमान्वये बांगुरनगर पोलीस ठाणे, मालाड पश्चिम, मुंबई येथे दिनांक ०८/०१/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापकाचे पद रिक्त असल्याबाबत

**(८१) * ४१६ श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास : तारांकित प्रश्न क्रमांक ४२७२४ ला दिनांक १६ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयातील १३ हजार सहाय्यक प्राध्यापकांची पदे रिक्त असल्याचे दिनांक १६ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर सहाय्यक प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

(२) उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील पदभरतीवरील निर्बंध दिनांक ०३/११/२०१८ च्या शासन निर्णयान्वये शिथिल करण्यात आले आहेत. त्यानुसार सहाय्यक प्राध्यापकांची ३५८० पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी १०७७ पदांवर प्रत्यक्ष नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत. उर्वरित पदभरतीची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेंद्र भागवत**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.